रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १९ ◆ अंक ३१
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ सोमवार, १७ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

उंच मानवी मनोरे रचण्यासाठी गोविंदा पथकांचा सराव/२
'वंदे मातरम्'चा अवमान; भाजयुमोचा रास्ता रोको!/५
जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत राजेश गोहिल प्रथम/८

### 'एफडीए'ची तीन बॉलीवूड कलाकारांना नोटीस

**मुंबई :** महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) अभिनेता शाहरूख खान, अजय देवगण आणि टायगर श्रॉफ यांना पान मसाल्याची अप्रत्यक्ष जाहिरात केल्याप्रकरणी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. महाराष्ट्रात पान मसाल्याची निर्मिती करणे, साठवणे तसेच वाहतूक, वितरण आणि विक्रीवर बंदी आहे. २०२४मध्ये तिन्ही कलाकार पान मसाला कंपनीच्या विमल इलायची जाहिरातीत ते एकत्र दिसले होते. अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखालील एफडीएने तीनही कलाकारांना नऊ पानांची नोटीस बजावली आहे. त्यांनी तातडीने 'विमल इलायची'ची जाहिरात करणे बंद करावे, तसेच त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवरून या जाहिरातीशी संबंधित सर्व प्रमोशनल कंटेंट हटवण्याचे निर्देश दिले असून १५ दिवसांत उत्तर देण्यास सांगितले आहे.

# महाड एमआयडीसीत वायूगळती

## ६० जण बाधित, दोन कामगारांचा मृत्यू, परिसरात खळबळ

**महाड : प्रतिनिधी**

महाड औद्योगिक क्षेत्रातील इंडो अमाईन्स लि. कंपनीत शनिवारी (दि.१५) संध्याकाळी गॅस गळती होऊन कामगार आणि इतर असे एकूण ६० जण बाधित झाले. यापैकी दोघांचा मृत्यू झाला आहे.

महाड एमआयडीसीत आसनपोई गावाजवळील प्लॉट नंबर बी १४ येथे इंडो अमाईन्स कारखाना असून या कारखान्यामध्ये शनिवारी नेहमीप्रमाणे कामगार शिफ्टमध्ये काम करत होते. सायंकाळी सहाच्या सुमारास कंपनीत हायड्रोक्लोरिक ॲसिडमधून निघणाऱ्या विषारी वायूची अचानक गळती सुरू झाली. या गॅसची तीव्रता इतकी होती की कामगारांना डोकेदुखी, घसा खवखवणे, छातीमध्ये जळजळ होणे, चक्कर येणे, उलटी होणे आणि खोकल्याची सुरुवात झाली. यानंतर संपूर्ण कारखाना खाली करण्यात आला.



इंडो अमाईन्स कंपनीमधील चार कामगारांसह शेजारील विरल आणि विनती कारखान्यातील जवळपास ५५ कामगार बाधित झाले. एवढेच नव्हे तर कंपनीबाहेरील रस्त्यावरून जाणाऱ्यांनाही याचा त्रास झाला. तेथून जाणारी आसनपोई गावातील दीक्षा निकम ही महिला बेशुद्ध होऊन पडली.

वायुगळतीबाधितांना महाडमधील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यापैकी अमित कुमार (वय २८, रा. मूळ उत्तर प्रदेश) याचा मृत्यू झाला, तर शेजारील विरल कंपनीत काम करणारा कल्पेश वांद्रे (वय ३१, रा. बोरगाव) याचा मुंबईतील हॉस्पिटलमध्ये उपचारादरम्यान मृत्यू झाला.

घटनास्थळी महाड पोलीस प्रशासन, फॅक्टरी इन्स्पेक्टर आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी दाखल झाले असून ही गॅस गळती कोणत्या कारणामुळे झाली याबाबत चौकशी सुरू आहे. या प्रकरणी शिफ्ट इन्चार्ज मधुसूदन गोडबर्डे आणि प्लांट मॅनेजर विकास आपोसकर यांच्यावर महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्याकडूनही अधिक तपास सुरू आहे.

दरम्यान, महाड औद्योगिक वसाहतीत वारंवार गॅस गळतीच्या घटना घडत असल्याने कामगारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. कंपनीतील सुरक्षा उपाययोजनांची तपासणी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# तुमचे पाप देशातील जनता कधीच माफ करणार नाही!

## वंदे मातरम् मुद्द्यावरून गृहमंत्री अमित शाहांचा सोनिया गांधींवर हल्लाबोल

**चित्तोडगड : वृत्तसंस्था**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी (दि.१६) राजस्थानमधील चित्तोडगड येथे बोलताना वंदे मातरम्वरून काँग्रेस पक्षावर जोरदार हल्ला चढवला. 'काँग्रेसच्या मुख्यालयात वंदे मातरम् हे राष्ट्रीय गीत गायले जात असताना सोनिया गांधी यांनी काँग्रेस अध्यक्षांना ते गाणे थांबवण्यास सांगितले. हे पाप देशातील जनता कधीही माफ करणार नाही', असे गृहमंत्री शाह म्हणाले.



गृहमंत्री शाह यांच्या हस्ते चित्तोडगडमधील निंबाहेडा येथे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या २१ फूट उंच पुतळ्याचे अनावरण त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त करण्यात आले. त्यावेळी झालेल्या जाहीर सभेत ना. शाह बोलत होते. त्यांनी चित्तोडगडसह १५ जिल्ह्यांमधील ५६५९ कोटी रुपयांच्या ९४४ कामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन केले.

यावेळी केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी म्हटले की, मतपेढीच्या राजकारणाच्या लालसेपोटी काँग्रेसने 'वंदे मातरम्'ला विस्मृतीत टाकले होते, परंतु लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या राष्ट्रीय गीताला एक नवे आयुष्य देण्याचे काम केले आहे. ८० वर्षांनंतर बंकिमबाबूंच्या या अमर गीताला पुन्हा सन्मान मिळत आहे, हेही सोनिया गांधींना सहन होत नाही.

ना. शाह पुढे म्हणाले की, वंदे मातरम् हे गीत अर्धवट सोडले जावे, असा विचार कोणी स्वप्नातही कसा करू शकतो? काँग्रेसवाल्यांना लाज वाटली पाहिजे. अजून थोडीही लाज शिल्लक असेल, तर दोन्ही हात जोडून बंकिमबाबूंच्या अमर आत्म्याची आणि देशातील जनतेची त्यांनी माफी मागावी.

## नालासोपाऱ्यात केकमधून ११ जणांना विषबाधा

**नालासोपारा : प्रतिनिधी**

नालासोपारा पूर्वेकडील लक्ष्मी नगर परिसरातील निळकंठ अपार्टमेंटमध्ये वाढदिवसाच्या केकमधून विषबाधा झाल्याचे समोर आले आहे. या घटनेत ११ जणांना त्रास झाल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. यापैकी चार जणांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

निळकंठ अपार्टमेंटमध्ये शनिवारी एका मुलीच्या वाढदिवसानिमित्त पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. केक खाल्ल्यानंतर काही वेळातच काही जणांना मळमळ, उलट्या आणि चक्कर येण्यास सुरुवात झाली. दरम्यान, उपस्थित काही मुलांनी केकमध्ये पाल पडल्याचा आरोप केला आहे. याबाबत अधिकृत रिपोर्टची प्रतीक्षा आहे.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते अत्याधुनिक पॅथॉलॉजी लॅबचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या माध्यमातून नागरिकांना अधिक दर्जेदार व सुलभ आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने मोल एक्सपर्ट पॅथॉलॉजी लॅब ही नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र २, कोळीवाडा सुरू करण्यात आली आहे. या अत्याधुनिक लॅबचे उद्घाटन शनिवारी (दि. १५) आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या कार्यक्रमास महापौर नितीन पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती ममता म्हात्रे, प्रभाग समिती 'ड'चे सभापती अजय बहिरा, नगरसेवक डॉ.अरुणकुमार भगत, सुमित झुंजारराव, नगरसेविका दर्शना भोईर, प्रिती जॉर्ज, अस्मिता घरत आदी उपस्थित होते.



यावेळी मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले, महापालिकेच्या या लॅबमुळे रुग्णांच्या आजाराचे निदान लवकर होणार आहे. महापालिका दर्जेदार आरोग्य सुविधा देण्याच्या दृष्टीने महत्त्वाची पावे उचलत आहे. पालिकेच्या आरोग्य केंद्राच्या माध्यमातून सर्व डॉक्टर व आरोग्य कर्मचारी रूग्णांना योग्य उपचार देऊन नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत. याबद्दल त्यांचे अभिनंदन! प्राथमिक उपचारानंतर आता पुढील टप्प्यावरील आरोग्य सुविधा देण्यासाठी कटिबद्ध होऊया, असेही त्यांनी सांगितले. **(पान २ वर..)**

### निवडक

#### मुंबईत नौदलाच्या जवानासह पत्नी, मुलांचे आढळले मृतदेह

**मुंबई :** स्वातंत्र्यदिनी नौदलाचा जवान, त्यांची पत्नी आणि दोन मुले मुंबईतील नेव्ही नगर येथील निवासस्थानी मृतावस्थेत आढळून आली आहेत. नौसैनिक पुरणमल शंभूलाल मेहरा (वय ३०) यांनी गळफास घेतल्याचा संशय आहे, तर त्यांची पत्नी ओमा पूरनमल मेहरा (वय २८) आणि दोन्ही मुले यश पुरणमल मेहरा (वय ३) आणि लहान बाळ (वय २) बेडवर मयत आढळून आले. या प्रकरणी पोलीस तपास करीत आहेत.

#### महाडमधील काळ नदीपात्रात तरुण गेला वाहून; शोध सुरू

**महाड :** येथील काळ नदीपात्रात एक तरुण वाहून गेल्याची घटना घडली आहे. वेदांत बोंडलेकर (वय २०, रा. निजामपूर) असे या तरुणाचे नाव आहे. महाड तालुक्यातील पाने येथील धबधबा आणि काळ नदीला जोडणाऱ्या भागात ही दुर्घटना घडली. हा तरुण पाण्यात मौजमजा करीत असताना पाण्याचा अंदाज न आल्याने तो वाहून गेला. पोलीस आणि बचाव पथकाकडून बेपत्ता तरुणाचा शोध सुरू आहे.

## रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये इन्व्हेस्टिचर सेरेमनी

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये रविवारी (दि. १६) द्वितीय पदग्रहण समारंभ (इन्व्हेस्टिचर सेरेमनी) उत्साहपूर्ण वातावरणात झाला. विद्यार्थ्यांसाठी हा समारंभ त्यांच्या नेतृत्वगुणांना व जबाबदारीच्या भावनेला चालना देणारा ठरला.

संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, संस्थेचे व्हॉईस चेअरमन वाय.टी. देशमुख, कार्यकारी मंडळाचे सदस्य तथा पनवेल महापालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर, पंचायत समिती सदस्य वितेश म्हात्रे, साई संस्थान, उलवेचे अध्यक्ष रविशेठ पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे चेअरमन भार्गव ठाकूर, वर्षा ठाकूर, संस्थेचे सदस्य ॲड. राहुल घरत, अमोघ ठाकूर, आदेश ठाकूर, सचिव डॉ. एस.टी. गडदे, योगिता भगत, दिपाली ठाकूर, किशोर पाटील, सुधीर ठाकूर, स्वप्नील ठाकूर, साईचरण म्हात्रे, श्री. भगत, वसंत पाटील, कांता घरत, प्राचार्य राज अलोनी, समन्वयक रुहल दुबे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.




यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

दरम्यान, या समारंभात 'लोकनेता : एक युगपुरुष' या विषयावर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. यामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनप्रवासावर आधारित बालपण, शैक्षणिक प्रवास, कुटुंब, आध्यात्मिक जीवन व साहित्य-कला या विविध विषयांवरील सादरीकरणाने कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## राज्यात १,४४० डॉक्टरांची लवकरच होणार नियुक्ती

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात उपलब्ध झालेल्या १,४४० डॉक्टरांची येत्या काही दिवसांत नियुक्ती करण्यात येणार आहे. आणखी ६०० डॉक्टरांसाठी जाहिरात काढण्यात येत असून सुमारे २५० दंतचिकित्सकही लवकरच आरोग्य सेवेसाठी उपलब्ध होतील, अशी माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.



सार्वजनिक आरोग्य विभागाच्या महिला आरोग्य समिती, जन आरोग्य समिती आणि रुग्णकल्याण समितीच्या सदस्यांशी आरोग्यमंत्री आबिटकर यांनी ऑनलाइन पद्धतीने 'जन आरोग्य संवाद' साधला. आरोग्य सेवांशी संबंधित तक्रारी आणि समस्या नागरिकांना थेट प्रशासनापर्यंत पोहोचविता याव्यात यासाठी लवकरच ऑनलाइन पोर्टल कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्याद्वारे नागरिकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारली जाईल. स्थानिक बचत गटांच्या माध्यमातून रुग्णांना चांगल्या गुणवत्तेचा सकस आणि पोषक आहार उपलब्ध करून देण्याची व्यवस्थाही निर्माण करण्यात येणार, असेही त्यांनी सांगितले.

## पेणमध्ये विविध विकासकामांचा शुभारंभ

**पेण : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्यदिनी आमदार रविशेठ पाटील यांच्या ७७व्या वाढदिवसाचे औचित्य साधून पेणमध्ये नगर परिषदेच्या वतीने सुमारे ५१ कोटी २० लाख रुपयांच्या १२ विकासकामांपैकी सहा कामांचे लोकार्पण आणि पाच कामांचे भूमिपूजन उत्साहात झाले. नगराध्यक्ष प्रितम ललित पाटील यांच्या पुढाकाराने या विकासकामांचा शुभारंभ माजी खासदार धैर्यशील पाटील व आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.



पेण शहराच्या गतिमान विकासाला पूरक असे सिमेंट कॉक्रीटिकरण रस्ते, उद्यानाचे सुशोभीकरण, थोर पुरुषांचे स्मारक व म्युझिकल फाउंटन कारंजे या कामांमुळे शहराच्या सौंदर्यात भर पडली आहे. या कार्यक्रमास नगराध्यक्ष प्रितम पाटील, उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील, मुख्याधिकारी जीवन पाटील, सत्ताधारी गटनेते अनिरुद्ध पाटील, उद्योजक राजू पिचिका, सभापती, नगरसेवक, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, व्यापारीवर्ग, भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

यावेळी नगर परिषद हद्दीतील बाह्य वळण राष्ट्रीय महामार्ग १६६ ते अंतोरे रस्त्याचे काँक्रीटीकरण, अंतोरा रस्त्याजवळील थीम पार्क ते रविराज फार्म हाऊसदरम्यानचा रस्ता काँक्रीट पद्धतीने विकसित करणे, शंकर नगर येथे नमो उद्यान बांधणे, कासार तलाव येथे म्युझिकल फाउंटन बसविणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते नंदीमाळ नाका ते भुंडा पूलदरम्यान रस्ता काँक्रीट पद्धतीने विकसित करणे, चिंचपाडा रिंग रोड येथे छत्रपती संभाजी महाराज चौक सुशोभीकरण अशा विविध विकासकामांचे लोकार्पण आणि भूमिपूजन करण्यात आले.

शहरातील काँक्रीटीकरण व रुंदीकरण करताना ज्या नागरिकांनी, व्यापाऱ्यांनी सहकार्याची भूमिका घेतली त्या सर्वांचे नगराध्यक्ष म्हणून मी आभार मनात असल्याचे यावेळी नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी सांगितले.

## महाराष्ट्राच्या कृषी विभागाला केंद्राकडून पुरस्कार जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत महाराष्ट्राच्या कृषी विभागाने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची केंद्र सरकारने दखल घेतली आहे. या कामगिरीबद्दल महाराष्ट्राची राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

याबाबत केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाने महाराष्ट्राच्या कृषी विभागाच्या प्रधान सचिवांना पत्राद्वारे माहिती दिली. २४ आणि २५ ऑगस्ट रोजी नवी दिल्लीतील इंडिया हॅबिटॅट सेंटर येथे होणाऱ्या पीएमएफएमई कॉन्क्लेव्हमध्ये महाराष्ट्राचा गौरव करण्यात येणार आहे.

राज्याच्या वतीने कृषीमंत्री दत्तात्रय भरणे हे केंद्रीय अन्न व नागरी पुरवठामंत्री प्रल्हाद जोशी यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारतील. महाराष्ट्राच्या कृषी विभागासाठी हा एक अभिमानाचा क्षण ठरणार आहे.



**खारघर :** आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून खारघर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा नगरसेविका उषा अडसूळे आणि अजित अडसूळे यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांच्या हस्ते विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना स्मार्टवॉच देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, प्रभाग समिती सभापती मधु पाटील आदी उपस्थित होते. (वृत्त पान ३ वर..)

# दहीहंडी उत्सवाला 'युनेस्को'मध्ये घेऊन जाणार -मंत्री आशिष शेलार

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनातर्फे दहीहंडी उत्सवाला युनेस्कोच्या (UNESCO) जागतिक वारसा यादीत नेण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. तसेच आपल्या गोविंदांना स्पेनलाही पाठवणार आहोत, अशी घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री अँड आशिष शेलार यांनी आज केली. तसेच उत्सव साजरे करताना सुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन करा, असे आवाहनही त्यांनी उत्सव मंडळांना केले.



महाराष्ट्रातील दहीहंडी पथक, गोविंदा आणि दहीहंडी उत्सवासाठी कार्यरत असलेल्या विविध संघटनांच्या सहभागातून स्थापन झालेल्या "महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशनच्या" वतीने आयोजित करण्यात आलेला 'कृष्णानंद सोहळा' रविवारी (१६ ऑगस्ट) परळ येथील राष्ट्रीय मजदूर मिल संघ, मजदूर मंदिर येथे आज उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशन अध्यक्ष बाळा पडेलकर, कार्याध्यक्ष सुरेंद्र पांचाळ, सचिव गीता झगडे, अभिषेक सुर्वे यांसह महाराष्ट्रातील महिला व पुरुष दहीहंडी पथके, गोविंदा तसेच दहीहंडी उत्सवासाठी कार्यरत विविध संघटनांचे पदाधिकारी व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दहीहंडी उत्सवाचे नियोजन अधिक शिस्तबद्ध पद्धतीने करणे, गोविंदांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे तसेच श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्साह द्विगुणित करण्याच्या उद्देशाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सामुहिक श्रीकृष्ण आरतीही करण्यात आली. दहीहंडी उत्सवात सहभागी होणाऱ्या पथकांनी सुरक्षेच्या सर्व नियमांचे पालन करावे, आवश्यक खबरदारी घ्यावी, रहदारीचे, वाहतूकीचे नियम पाळा, पादचारी, नागरिक यांना त्रास होणार नाही याची काळजी घ्या आणि उत्सवाचा आनंद सुरक्षित वातावरणात घ्यावा, असे आवाहन यावेळी या मेळाव्याचे प्रमुख मार्गदर्शक मंत्री अँड आशिष शेलार यांनी केले.

यावेळी मंत्री आशिष शेलार यांनी आपल्या भाषणात गोविंद पथकांची सर्वोच्च न्यायालयापर्यंत जी लढाई कशी लढावी लागली त्याचे संपूर्ण विवेचन केले. त्यावेळी मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस हे अत्यंत खंबीरपणे उभे राहिले. न्यायालयाला सरकारने ठणकावून सांगितले म्हणूनच लढाई जिंकता आली, असेही त्यांनी नमूद केले.

## अल्पवयीन तरुणी गर्भवती; फसवणूकप्रकरणी तरुणावर गुन्हा

**नवीन पनवेल :** अल्पवयीन तरुणीसोबत शारीरिक संबंध ठेवून ती गरोदर राहिली आणि तिच्यासोबत लग्न न करता फसवणूक केल्याप्रकरणी अरबाज सलीम शेख (वय २६ राहणार वडघर) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात १४ ऑगस्ट रोजी पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. यातील अल्पवयीन तरुणी सोबत अरबाज शेख याने शारीरिक संबंध ठेवून फोटो घरच्यांना पाठवण्याची धमकी दिली आणि लग्न करणार असल्याचे सांगून शारीरिक संबंध ठेवले.

## मयत अनोळखी व्यक्तीबद्दल तळा पोलिसांकडून आवाहन

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील मेढे आदिवासीवाडी येथे एका ओटीवर अधूनमधून वास्तव्य करणाऱ्या प्रवीण दामोदर पाटील यांचे आजाराने निधन झाले. त्याच्याबद्दल काहीच माहिती उपलब्ध नसल्याने पोलिसांनी याबाबत आवाहन केले आहे.

प्रवीण पाटील (वय ४२) यांच्या खिशात आधार कार्ड ८९४०१७३०३३११ असून त्यावरील पत्ता रा.३/४/५ न्यू अल्का रेस्टॉरंट, मनिषा सर्कल व्रज स्क्वेअरजवळ जुना पदरा रोड, पो.रेसकोर्स, जि.वडोदरा, गुजरात असा आहे. नातेवाईकांनी संपर्क साधावा, असे आवाहन आहे.

## कोयना समाजाचा रक्तदानाचा विक्रम; तीन वर्षांत २५०७ रक्त बाटल्यांचे संकलन

**खोपोली : प्रतिनिधी**

कोयना समाजाचे दिवंगत नेते तथा कोयना रत्न कृष्णा मुसळे यांच्या स्मरणार्थ गेल्या तीन वर्षांपासून महारक्तदान अभियान राबविण्यात येत आहे. यंदा २ ऑगस्ट आणि १६ ऑगस्ट रोजी रायगड व ठाणे जिल्ह्यात आयोजित रक्तदान शिबिरांमध्ये तब्बल ९५३ रक्तबॉटलींचे संकलन करण्यात आले.

पहिल्या वर्षी ६८६, दुसऱ्या वर्षी ८६८, तर यंदा ९५३ रक्तबॉटली संकलित झाल्याने सलग तीन वर्षांत एकूण २५०७ रक्तबॉटलींचे संकलन झाले आहे. कोयना समाजाने उभारलेला हा रक्तदानाचा विक्रम मानवतेच्या सेवेसाठी प्रेरणादायी ठरत आहे.



"रक्ताला धर्म, जात किंवा पक्ष नसतो; रक्त फक्त जीवन वाचवते," या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला. समाजाचे अध्यक्ष बळीराम शिंदे, सचिव बळीराम चव्हाण सर तसेच कार्यकारिणीतील पदाधिकारी सुरेश चाळके, शामकांत सावंत, राजेंद्र लाड, धनाजी सकपाळ, किसन जाधव, बाळकृष्ण मोरे आणि मिलिंद रेवणे यांनी या अभियानासाठी विशेष मेहनत घेतली.

उपक्रमाचे प्रमुख महेंद्र सावंत यांनी उत्कृष्ट नियोजन व आयोजन करत रक्तसंकलनाचा विक्रमी आकडा गाठण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

त्यांच्या नियोजनाला विठ्ठल मोरे, अशोक भाऊ जाधव, पांडुरंग साळुंखे, एम.डी. चाळके, उमेश कदम, लक्ष्मण जाधव, दत्तात्रय सकपाळ, सुभाष सावंत, नारायण कदम, शशिकांत शिंदे आणि शंकर निवळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## तरुण उद्योजकांना अर्थसहाय्यासह आवश्यक ती मदत करणार -आमदार प्रवीण दरेकर

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील तरुणांनीही उद्योग-व्यवसायाच्या क्षेत्रात पुढे येण्याचा निर्धार केला पाहिजे. उद्योग क्षेत्राची प्रगती झाली तरच तालुक्याचा सर्वांगीण विकास होईल.पोलादपूर तालुक्याच्या सर्वांगिण विकासासाठी मी कटिबद्ध आहे. शासन स्तरावर आवश्यक असलेल्या योजना तालुक्यात आणण्यासाठी निश्चित प्रयत्न करेन, अशी ग्वाही येथील कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहात विधान परिषद भाजपचे गटनेते आ.प्रवीण दरेकर यांनी दिली.



पोलादपूर तालुक्यातील कोतवाल येथील कालकाईमाता क्रीडा व सामाजिक संस्था (रजि.) यांच्या वतीने संस्थेचे संस्थापक तथा भाजपा गटनेते, विधानपरिषद सदस्य आ. प्रवीण दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य शेतकरी मेळावा, कर्तव्यदक्ष सेवा सन्मान पुरस्कार वितरण सोहळा तसेच डॉक्टर फॉर यू यांच्या माध्यमातून आशा सेविकांना मेडिकल किट वाटपाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या मेळाव्याला शेतकरी, महिला, युवक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठी उपस्थिती होती.

या शेतकरी मेळाव्यात आरोग्य विभागाच्या वतीने आयुष्मान भारत कार्ड तसेच आभा कार्डसाठी व महसुल विभागातर्फे शिधापत्रिका, इतर योजना स्टॉल उपलब्ध करून देण्यात आले होते. तसेच शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कृषी योजनांची माहिती तालुका कृषी सहाय्यक रवींद्र गुंड यांनी दिली.यावेळी कर्तव्यदक्ष सेवा सन्मान पुरस्काराने तहसीलदार कपिल घोरपडे, महावितरणचे उपकार्यकारी अधिकारी चोरमळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सहाय्यक अभियंता संदेश कांबळे, कृषी विभाग व पंचायत समितीतील अधिकारी तसेच नरवीर रेक्स्यूचे संस्थापक रामदास कळंबे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा त्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

माजी सैनिक शिवाजी डोळे यांचा विशेष उल्लेख करत त्यांच्या कार्याचा आदर्श तरुणांनी घ्यावा, असे आवाहन केले. तरुणांनी उद्योग क्षेत्रात पुढे येऊन स्वतःच्या पायावर उभे राहावे. उद्योजकतेसाठी आवश्यक असलेले अर्थसहाय्य तसेच अन्य मदत करण्यासाठी आपण सदैव तयार असल्याचे आ.दरेकर यांनी सांगितले.महिला वर्गानेही रोजगार निर्मितीसाठी पुढाकार घ्यावा. बँकांच्या माध्यमातून महिलांना अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक ते सहकार्य करण्याची तयारी असल्याचेही आ. दरेकर यांनी यावेळी सांगितले.

या कार्यक्रमाला सभापती अविनाश शिंदे, भाजपा उपाध्यक्ष मनोज भागवत, बिपिन म्हामुणकर, माजी तालुकाध्यक्ष प्रसन्न पालांडे, भाजपा नेते नागेंद्र राठोड, माजी खासदार ब्रिगेडियर सुधीर सावंत, सुभेदार सुभाष दरेकर, तालुकाध्यक्ष वैभव चांदे, युवा मोर्चा उपाध्यक्ष दर्पण दरेकर, शहराध्यक्ष महेश निकम, भाजपा युवा मोर्चा शहराध्यक्ष शुभम दरेकर, निलेश अहिरे उद्योजक रामदास कळंबे,तहसीलदार कपिल घोरपडे, गटविकास अधिकारी दीप्ती गाट उपस्थित होते.

## नवी मुंबई महापालिका मुख्यालयात फाळणी, वंदे मातरम्'विषयक माहितीपूर्ण प्रदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

९ ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार 'घरोघरी तिरंगा' अर्थात 'हर घर तिरंगा' मोहीम नवी मुंबईत उत्साहाने राबविण्यात येत असून त्या अंतर्गत सांस्कृतिक, शैक्षणिक, कला, साहित्य, सामाजिक, आरोग्य व स्वच्छताविषयक विविध उपक्रम उत्साहाने राबविण्यात येत आहेत.

या अनुषंगाने १४ ऑगस्ट रोजीच्या फाळणी भयावहता स्मृती दिनानिमित्त विष्णुदास भावे नाट्यगृह येथे दोन दिवसीय फाळणीविषयक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते तसेच महापालिका मुख्यालयात याविषयी माहितीपूर्ण लघुपटाचे प्रक्षेपण करण्यात आले होते.



यावर्षी 'वंदे मातरम्' या राष्ट्रीय गीताला १५० वर्षे पूर्ण होत असल्याने 'हर घर तिरंगा' मोहीम ही 'वंदे मातरम्' च्या १५० वर्षांच्या स्मरणाशी जोडली गेली असल्याने भारत सरकारच्या संस्कृति मंत्रालयाच्या वतीने निर्मिलेल्या 'तिरंगा आणि वंदे मातरम् प्रदर्शना'चे आयोजन नमुंमपा मुख्यालय, सीबीडी बेलापूर येथे १५ ते १७ ऑगस्ट २०२६ कालावधीत करण्यात आले आहे.

स्वातंत्र्यदिनी मुख्यालयातील ध्वजारोहणानंतर महापौर सुजाता पाटील, महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, आरोग्य समिती सभापती डॉ.जयाजी नाथ इतर मान्यवर, अधिकारी, कर्मचारीवृंद तसेच मोठ्या संख्यने उपस्थित असलेल्या नागरिकांनी 'ध्वज, राष्ट्रगान, देश' या प्रदर्शनाला भेट देत तिरंगा ध्वजाची आणि राष्ट्रीय गीताची सविस्तर माहिती आणि इतिहास जाणून घेतला.बंकिमचंद्र चटर्जी यांनी रचलेले 'वंदे मातरम्' हे गीत, ७ नोव्हेंबर १८७५ रोजी 'बंगदर्शन' या साहित्यविषयक नियतकालिकेत पहिल्यांदा प्रकाशित झाले होते. त्यानंतर बंकिमचंद्र चटर्जी यांनी हे प्रार्थना गीत, १८८२मध्ये प्रकाशित झालेल्या, 'आनंदमठ' या आपल्या अजरामर कादंबरीत समाविष्ट केले होते.

गुरूदेव रवींद्रनाथ टागोर यांनी या गीताला संगीतबद्ध केले. आणि आज हे गीत देशाच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि वैचारिक चेतनेचा अविभाज्य भाग बनले आहे. विविध उपक्रमांच्या माध्यमातून वंदे मातरम् गीताने एकता, त्याग आणि समपर्णाचा दिलेला संदेश पुन्हा एकदा दृढ केला जात आहे.

## इमारतीचा स्लॅब कोसळून एक जण जखमी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील परदेशी आळी परिसरातील माणिकनगर येथील इमारतीचा स्लॅब अचानक कोसळल्याची दुर्घटना शनिवारी घडली. या घटनेत सी-विंगमधील रूम क्रमांक २०२मध्ये राहणारे शैलेशकुमार वाझा गंभीर जखमी झाले आहेत. त्यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार शैलेशकुमार वाझा हे घरात असताना अचानक छताचा सिमेंटचा स्लॅब खाली कोसळला. स्लॅबचा मोठा भाग अंगावर पडल्याने ते जखमी झाले. त्यांच्या हात आणि पायांना जखमा झाल्या आहेत. अचानक झालेल्या मोठ्या आवाजामुळे इमारतीतील तसेच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. रहिवाशांनी तातडीने मदतकार्य करत त्यांना ढिगाऱ्यातून बाहेर काढले आणि रुग्णालयात दाखल केले.

## रोह्यात उंचच उंच मानवी मनोरे रचण्यासाठी गोविंदा पथकांचा जोरदार सराव

**धाटाव : प्रतिनिधी**

दहीहंडी उत्सवाला आता अवघे काही दिवस शिल्लक असताना रोहा तालुक्यात गोविंदा पथकांनी जोरदार सरावाला सुरुवात केली आहे. गावोगावी मंदिरांसमोर, शाळांच्या पटांगणात तसेच मोकळ्या मैदानांवर ७ ते ८ थरांचे मानवी मनोरे रचण्याचा थरारक सराव सुरू असून, गोविंदा पथकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

रोहा तालुक्यातील कालभैरव बोरघर, जय बजरंग लाढंर, तळाघर, निवी, धाटाव, किल्ला, रोठ खुर्द, देवकान्हे , नागोठणे, आमडोशी, कडसुरे यांसह अनेक गावांतील गोविंदा पथकांनी यंदाच्या दहीहंडी उत्सवाची तयारी सुरू केली आहे. प्रत्येक पथकामध्ये साधारण १०० ते १२० गोविंदा एकत्र येत असून, आपल्या गावाच्या नावाला मान मिळवून देण्यासाठी उंचच उंच मानवी मनोरे रचण्याचा निर्धार केला जात आहे.



गेल्या ८ ते १० दिवसांपासून पथकांचा नियमित सराव सुरू आहे. सायंकाळी साडेसात ते रात्री नऊ-साडेनऊ वाजेपर्यंत जवळपास दोन तास गोविंदा मैदानावर घाम गाळताना दिसत आहेत. दिवसभराची कामे आटोपून, शेतातून तसेच कामावरून परतल्यानंतरही अनेक गोविंदा सरावाला प्राधान्य देत आहेत."एक थर वाढवायचा, पण सुरक्षिततेची काळजी घ्यायची" या उद्देशाने अनुभवी गोविंदांच्या मार्गदर्शनाखाली सराव केला जात असून, यंदा कोणते पथक किती उंच मनोरा रचणार, याची उत्सुकता आतापासूनच निर्माण झाली आहे.

रोहा शहरात दरवर्षीप्रमाणे श्री सुनील तटकरे प्रतिष्ठानतर्फे दहीहंडीचे आयोजन केले जाते. तसेच शिंदे शिवसेनेतर्फेही दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात येते. यंदा मात्र श्री. प्रमोद म्हस्कर प्रतिष्ठानतर्फे सर्वात मोठी दहीहंडी आयोजित होणार का? याकडे रोहेकरांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे यंदाच्या दहीहंडी उत्सवात कोणती हंडी सर्वात मोठी ठरणार आणि कोणते गोविंदा पथक उंच मनोरा रचून विक्रम करणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

पान १ वरुन

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते अत्याधुनिक पॅथॉलॉजी लॅबचे उद्घाटन

पनवेल महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या सहकार्याने मोल एक्सपर्ट इन्फेक्शस डिसीज अँड मॉलिक्युलर लॅबोरेटरी यांच्या माध्यमातून ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या प्रयोगशाळेमध्ये रक्त तपासणी अंतर्गत आरबीएस, टी३, टी४, टीएसएच, एलएफटी, आरएफटी, मलेरिया, डेंग्यू, हिमोग्लोबिन अशा विविध १३२ विविध प्रकारच्या वैद्यकीय तपासण्या अधिक सुलभपणे उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याची माहिती मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ आनंद गोसावी यांनी प्रास्ताविकात दिली.

पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांना आरोग्यविषयक सुविधा अधिक सक्षमपणे उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पॅथॉलॉजी लॅबमुळे परिसरातील नागरिकांना आवश्यक वैद्यकीय तपासण्या उपलब्ध होऊन आरोग्यसेवा अधिक प्रभावी व लोकाभिमुख होण्यास मदत होणार आहे.

## विजय सावंत यांच्या 'विळखा' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**अलिबाग : प्रतिनिधी**

अंकुर फांऊडेशन लोणेरे यांच्या वतीने आयोजित चारोळी वृक्ष संवर्धन प्रकल्प कार्यक्रमात गोरेगांव कोकण मराठी साहित्य परिषदेचे ज्येष्ठ सदस्य विजय बाबा सावंत यांच्या 'विळखा ' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन ज्येष्ठ साहित्यिक श्रीप्रकाश अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले .

गोरेगांव येथील बुद्ध विहारात हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक श्रीप्रकाश अधिकारी तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक प्रा. सूर्यकांत वैद्य उपस्थित होते. अंकुरचे अध्यक्ष उदय चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. कवी विजय सावंत आणि त्यांचा परिवार तसेच अंकुरचे मंगेश पेठे , सामाजिक कार्यकर्ते विकास गायकवाड , सुनील चिटणीस यांच्यासह परीसरातील साहित्यप्रेमी नागरीक उपस्थित होते.




अध्यक्षस्थानावरून बोलताना श्रीप्रकाश अधिकारी यांनी विजय सावंत यांच्या काव्य प्रतिभेचे कौतुक केले. ग्रामीण भागात राहूनदेखील सावंत यांनी सर्वस्पर्शी कविता लिहिल्या. विशेषतः त्यांच्या कवितेतून समाजभान, विद्रोह याबरोबरच प्रेम, विनोद आणि विडंबन पहायला मिळते. अंडयामध्ये पांढरा आणि पिवळा बलक असतो परंतु ते उबवलं तर त्यातून पिल्लू बाहेर पडते ही कवितेची ताकद असल्याचे श्रीप्रकाश अधिकारी म्हणाले. विळखा काव्यसंग्रह हा ग्रामीण आणि शहरी साहित्याचा सुंदर मिलाप असल्याचे प्रमुख पाहुणे प्रा. सूर्यकांत वैद्य यांनी नमूद करत विजय सावंत यांच्या पुढील साहित्यिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

प्रारंभी सुरेंद्र घोसाळकर, प्रफुल्ल पवार, कोमसापचे अ. वि. जंगम, विजय सावंत ज्येष्ठ साहित्यिक तानाजी धरणे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर अंकुरच्या चारोळी वृक्ष संवर्धन प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना चारोळी वृक्ष वाटप करण्यात आले. यावेळी चारोळी वृक्ष संवर्धनाचे महत्व उपस्थितांना पटवून देण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील चिटणीस यांनी केले.

### दुखवटा

## सीताबाई शेशवरे

**नवी मुंबई :** ज्येष्ठ पत्रकार, जर्नलिस्ट वेलफेअर असोसिएशनचे अध्यक्ष अशोक शेशवरे यांच्या मातोश्री स्व. सीताबाई ज्ञानू शेशवरे यांनी वयाच्या ७४व्या वर्षी रविवारी (दि. १६) सकाळी अल्पशा आजाराने मिरज येथील सेवासदन हॉस्पिटलमध्ये अखेरचा श्वास घेतला.



स्व. सीताबाई यांचा अंत्यविधी मुळगावी मु.पो.अग्रण धुळगाव, ता. कवठेमहांकाळ, जि. सांगली येथे झाला. त्यांचा रक्षा विसर्जन आणि श्रद्धांजली कार्यक्रम मंगळवार (दि. १८) रोजी सकाळी १० वाजता मूळ गावी होणार असल्याचे शेशवरे परिवाराच्या वतीने सांगण्यात आले आहे. स्व. सीताबाई यांच्या पश्चात पती माजी सैनिक ज्ञानू शेशवरे, दोन मुलगे, एक मुलगी, दोन सुना, नातसूना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त अडसुळे दाम्पत्याकडून गुणवंत विद्यार्थ्यांना स्मार्टवॉच भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त नगरसेवक उषा अडसुळे आणि त्यांचे पती अजित अडसुळे यांच्या माध्यमातून दहावी व बारावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. यावेळी १५० हून अधिक विद्यार्थ्यांना स्मार्टवॉच देऊन त्यांच्या यशाचे कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या यशाचे कौतुक व्हावे, या उद्देशाने अडसुळे दांपत्याकडून दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. याच सामाजिक बांधिलकीतून यंदाही गुणवंत विद्यार्थ्यांसाठी विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.



शिक्षणाच्या प्रवासात विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचा उपयोग व्हावा, यासाठी यापूर्वी अडसुळे दांपत्याकडून विद्यार्थ्यांना टॅबचे वाटप करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या आधुनिक साधनांचा उपयोग त्यांच्या शैक्षणिक वाटचालीत व्हावा, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले. या कार्यक्रमाला माजी सभागृह नेते नगरसेवक परेश ठाकूर, पमपा माजी विरोधीपक्ष नेते प्रीतम म्हात्रे, महिला व बालकल्याण समिती सभापती ममता म्हात्रे, सभापती मधु पाटील, नगरसेवक शत्रुघ्न काकडे, नगरसेवक समीर कदम, हर्षदा उपाध्याय, नगरसेवक पटेल, कीर्ती नवघरे, अमर उपाध्याय, नगरसेवक शत्रूग्न काकडे, ऍडव्होकेट नरेश ठाकूर, नगरसेविका सोनल नवघरे, अनिता पाटील, परेशा पटेल, माजी नगरसेविका हर्षदा उपाध्याय, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, कीर्ती नवघरे, अमर उपाध्याय, दीपक शिंदे, वासुदेव पाटील, अजय माळी, रामचंद्र पाटील, प्रवीण बेरा, संदीप माघाडे,डॉक्टर विकास मोरे, संपदा चव्हाण, संगीत काळे, मधुरा मानकर, सुनील पाठक, क्रिश माने, सुनील वर्पे, दादा भिंगारदिवे, महेश चव्हाण यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.

# पनवेल रेल्वेस्थानकात गॅस टँकरला गळती; अग्निशमन दल आणि प्रशासनाच्या तत्परतेमुळे दुर्घटना टळली

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वे स्थानकात रात्री जेएनपीटीहून रायपूरच्या दिशेने जाणाऱ्या मालवाहू रेल्वेवरील एचपीसीएलच्या गॅस टँकरला अचानक गळती लागल्याची घटना घडली. प्लॅटफॉर्म क्रमांक पाचवर मालगाडी आल्यानंतर ही गळती निदर्शनास आली. घटनेची माहिती मिळताच रेल्वे प्रशासन, पनवेल अग्निशमन दल आणि रेल्वे पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आवश्यक उपाययोजना केल्याने मोठी दुर्घटना टळली.

गॅस गळतीचे गांभीर्य लक्षात घेऊन प्रवाशांच्या सुरक्षेसाठी प्लॅटफॉर्म क्रमांक पाच तातडीने रिकामा करण्यात आला. खबरदारीचा उपाय म्हणून पनवेल स्थानकातून डाऊन दिशेने जाणाऱ्या दोन तसेच अन्य दोन गाड्या स्थानकाबाहेरच थांबविण्यात आल्या. अग्निशमन दलाच्या पथकाने घटनास्थळी पोहोचून आवश्यक खबरदारी घेतली, तर रेल्वे पोलिसांनी प्रवाशांना सुरक्षित अंतरावर ठेवत परिसरात गर्दी होणार नाही याची दक्षता घेतली.



दरम्यान, एचपीसीएलच्या तज्ज्ञांचे पथकही घटनास्थळी दाखल झाले. तज्ज्ञांनी तातडीने उपाययोजना करत गॅस टँकरमधील गळतीवर पूर्णपणे नियंत्रण मिळविले. त्यानंतर रात्री सुमारे पावणेबाराच्या सुमारास मालगाडीला डिझेल इंजिन जोडून कळंबोली स्थानकाच्या दिशेने रवाना करण्यात आले. तेथे मालगाडी थांबवून टँकरच्या गळतीच्या दुरुस्तीचे अंतिम काम हाती घेण्यात आले.

या घटनेमुळे काही काळ रेल्वे प्रशासनाची धावपळ उडाली. मात्र, वेळीच केलेल्या उपाययोजनांमुळे मोठी दुर्घटना टळली. दरम्यान, या घटनेचा लोकल रेल्वे मार्गावर कोणताही परिणाम झाला नसून पनवेलहून धावणारी लोकल सेवा सुरळीत सुरू असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले.

# पनवेलमध्ये रक्तदान शिबिरास जैन समाजाचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : वार्ताहर**

समाजातील प्रत्येक नागरिकामध्ये स्वैच्छिक रक्तदानाची भावना रुजविण्यासोबतच नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व अधोरेखित करण्याच्या उद्देशाने रुधिरसेतू सेवा संस्था, श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ (मेवाड) उपसंघ पनवेल, इनर व्हील क्लब पनवेल सिटी आणि राजस्थानी महिला मंडळ, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने जैन स्थानक, साधना सदन, विश्राळी नाका येथे १५ ऑगस्ट रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते .



या शिबिराला समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या शिबिरात १०८ रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून गरजू रुग्णांसाठी जीवनदायी योगदान दिले. रक्तदानासोबतच रक्तगट तपासणी, हिमोग्लोबिन, रक्तदाब तसेच रक्तातील साखरेची तपासणी अशा विविध मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. जैन समाजातील समाजबांधव आणि भगिनींनी मोठ्या संख्येने सहभागी होत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. या उपक्रमासाठी सर्व सहयोगी संस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी रुधिरसेतू सेवा संस्थेच्या वतीने सुरेश रिसबूड, योगेश जोशी, सुनंदा कोठारी, मनीषा बोरा, सुवर्णा भंडारी, धनश्री बांठिया, नरेंद्रकुमार दसरे, उन्मेष लोहार, सानिका मराठे, माधुरी लोहार आणि कु. साम्य लोहार यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच इनर व्हील क्लब पनवेल सिटीच्या वतीने प्रेसिडेंट स्नेहल कल्याणकर, सेक्रेटरी विजेता कोठारी, कोषाध्यक्ष ध्वनी तन्ना, प्रतिभा डांगी, रीना गुंडेचा, शुभांगी दीक्षित, अर्चना परेश ठाकूर, जयश्री मंगलानी आणि नम्रता बांठिया, पल्लवी मुनोत यांनी मोलाचे सहकार्य केले.

रुधिरसेतू सेवा संस्थेच्या वतीने सर्व रक्तदाते, स्वयंसेवक तसेच उपक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व संस्थांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. "रक्तदान हेच श्रेष्ठ जीवनदान" हा संदेश समाजापर्यंत पोहोचवत युवकांनी अशा सामाजिक उपक्रमांमध्ये सातत्याने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शौर्य स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे भव्य जिम्नॅस्टिक्स स्पर्धा उत्साहात





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शौर्य स्पोर्ट्स अकॅडमीच्या वतीने नवीन पनवेल येथे रविवारी भव्य जिम्नॅस्टिक्स स्पर्धा २०२६च्या पारितोषिक वितरण व समारोप सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. खेळाडूंना प्रोत्साहन देणे आणि खेळूया घडूया, सक्षम भारत घडवूया या संकल्पनेला बळ देणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता.

या स्पर्धेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी दाखवलेले उत्कृष्ट शारीरिक कौशल्य पाहून उपस्थित मान्यवरांनी त्यांचे भरभरून कौतुक केले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मनोगत व्ये करताना सांगितले की,या स्पर्धेत सहभागी झालेले विद्यार्थी जर अशाच प्रकारे सातत्याने मेहनत करत राहिले, तर येत्या काळातते राष्टीय आणि आंतरराष्टीय पातळीवर निश्चितच मोठे यश मिळवू शकतात, असा ठाम विश्वास त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला तसेच नगरसेवक परेश ठाकूर यांनीही शुभेच्छा दिल्या.

या सोहळ्यास आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील आणि माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर यांच्यासह अनेक मान्यवरांनी भेट देऊन खेळाडूंनाशुभेच्छा दिल्या. मान्यवरांनी विद्याथ्यारनी सादर केलेली प्रात्यक्षिके पाहून त्यांचा उत्साह वाढवला. यास्पर्धेत अनेक बाल व तरुण खेळाडूंनी मोठ्या संख्येने भाग घेऊन आपल्या क्रीडा कौशल्याची छाप पाडली.

उपस्थितांनी सर्व खेळाडूंच्या कामगिरीचे कौतुक करत त्यांना भावी क्रीडा प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या. या क्रीडा उपक्रमामुळे स्थानिक खेळाडूंमध्ये एक नवा उत्साह आणि चैतन्य पाहायला मिळाले. या कार्यक्रमाचे आयोजन भाजपचे युवानेते मयूर शेळके यांनी केले होते.

यावेळी मनपा माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, नगरसेवक समीर ठाकूर, दशरथ म्हात्रे, सुमित झुंझारराव, शशिकांत शेळके, नगरसेविका राजश्री वावेकर, प्रतिभा भोईर, सरस्वती काथारा, माजी नगरसेवक अशोक शेळके, जिल्हा परिषद सदस्य प्राची जाधव, माजी सदस्य अमित जाधव, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, आयोजक मयूर शेळके, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, अमृत घाडगे, शैलेश जाधव, मयुर कदम, अक्षय शिघ, सुरेखा शेळके, हर्षदा शेळके, भोईर स्पोर्टस कॉम्प्लेक्सचे मुकुंद भोईर, पवन भोईर, अर्चना भोईर आदी उपस्थित होते.

# २५ हजारांचा गांजा जप्त; दोघांवर गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

उलवे सेक्टर २१ परिसरात बेकायदेशीरपणे गांजाची विक्री करणाऱ्या एका व्यक्तीला उलवे पोलिसांनी रंगेहाथ पकडले. त्याच्याकडून ५३० ग्रॅम गांजा आणि गांजा विक्रीतून मिळालेली दोन हजार रुपयांची रोकड, असा एकूण २७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुंगीकारक औषधी व मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, उलवे पोलीस ठाण्याचे पथक परिसरात गस्त घालत होते. यावेळी सेक्टर २१ मधील गार्डनच्या कोपऱ्याजवळील रस्त्यावर एक इसम संशयास्पदरीत्या उभा असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. पोलिसांना पाहताच त्याने तेथून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिसांनी पाठलाग करून सायंकाळी सातच्या सुमारास त्याला ताब्यात घेतले.

पोलीस व पंचांसमक्ष चौकशी केली असता त्याने आपले नाव इम्रान इम्तियाज शेख (वय ३२, रा. उलवे, मूळ रा. अमरोहा, उत्तर प्रदेश) असे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता प्लास्टिकच्या पिशवीत २५ हजार रुपये किमतीचा ५३० ग्रॅम गांजा आढळून आला. तसेच गांजा विक्रीतून मिळालेली दोन हजार रुपयांची रोकडही त्याच्याकडे सापडली.

पोलिसांनी अधिक चौकशी केली असता, सदर गांजा त्याला आसिफ मुस्तफा शेख (रा. मोहा गाव) याने विक्रीसाठी दिल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी गांजा आणि रोकड असा एकूण २७ हजार रुपयांचा मुद्देमाल पंचांसमक्ष सीलबंद करून जप्त केला.

या प्रकरणी इम्रान इम्तियाज शेख आणि आसिफ मुस्तफा शेख यांच्याविरोधात गुंगीकारक औषधी व मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक तुषार बच्छाव करीत आहेत.



**उरण : भारताचे माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी यांच्या स्मृतिदिनानिमित्त भाजप उरण संपर्क कार्यालयात अभिवादन करण्यात आले. यावेळी आमदार महेश बालदी, राज्य परिषद सदस्य व उपनगराध्यक्ष रवी भोईर, भाजप शहराध्यक्ष कौशिक शाह, उद्योजक धनाजी ठाकूर, नगरसेवक जसिम गॅस, भाजप जिल्हा कार्यकारिणी सदस्य सुनील पाटील, तालुका मंडळ अध्यक्ष धनेश गावंड,शहर मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर यांच्यासह इतर पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# पनवेल रेल्वेस्थानकात सायबर फसवणुकीविरोधात जनजागृती

**पनवेल : वार्ताहर**

आर्थिक आणि सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पनवेल रेल्वे पोलिसांकडून रेल्वे स्थानकात विशेष जनजागृती मोहीम राबविण्यात आली. बुकिंग हॉल, ब्रीज आणि फलाट परिसरात सकाळी ११.२५ ते दुपारी १२ वाजेपर्यंत ही मोहीम घेण्यात आली.

या वेळी रेल्वे प्रवाशांना ऑनलाइन तसेच आर्थिक फसवणुकीच्या विविध प्रकारांबाबत माहिती देऊन सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले. अल्पावधीत पैसे दुप्पट करण्याचे आमिष, बनावट गुंतवणूक योजना आणि अधिक व्याजदराचे प्रलोभन दाखवून होणाऱ्या फसवणुकीपासून नागरिकांनी सावध राहावे, असे पोलिसांनी सांगितले.

पासपोर्ट, आधारकार्ड किंवा पॅनकार्ड तातडीने काढून देण्याचे आमिष दाखविणाऱ्या व्यक्तींवर विश्वास ठेवू नये. घर-जमीन खरेदी-विक्रीच्या व्यवहारात एजंटमार्फत होणाऱ्या फसवणुकीपासूनही सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले. ऑनलाइन खरेदी करताना बनावट वेबसाइटची खात्री करूनच व्यवहार करावा, अशा सूचना देण्यात आल्या.

अनोळखी लिंकवर क्लिक करू नये किंवा अनोळखी क्यूआर कोड स्कॅन करू नये. बँकिंग अथवा यूपीआयचा पासवर्ड, ओटीपी आणि अन्य गोपनीय माहिती कोणालाही देऊ नये, असा महत्त्वाचा संदेश पोलिसांनी दिला. सार्वजनिक किंवा मोफत वाय-फाय वापरताना विशेष काळजी घेण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

बनावट केवायसीच्या नावाखाली कागदपत्रे किंवा वैयक्तिक माहिती मागणाऱ्यांना ती देऊ नये. सेक्सटॉर्शन किंवा डिजिटल ब्लॅकमेलिंगची घटना घडल्यास घाबरून न जाता तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा, असे पोलिसांनी स्पष्ट केले.सायबर फसवणूक झाल्यास विलंब न करता राष्ट्रीय सायबर हेल्पलाइन १९३०वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

# मध्यरात्री कारचा टायर फुटला; वाहतूक पोलिसांनी दाखवली माणुसकी!

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

चार चाकी गाडीचा फुटलेला टायर बदलण्यासाठी पनवेल वाहतूक शाखेचे पोलीस नाईक यांनी वाहनचालकाला रात्रीच्या वेळेस मदत केली. यावेळी कारमधील नागरिकांनी पोलिसांचे आभार मानले.

पहाटे साधारण साडेतीन ते पावणेचारच्या सुमारास एका रेंज रोव्हर कारचा अचानक टायर फुटला. यावेळी कारमध्ये दोन व्यक्ती होत्या. मात्र त्यांना वाहनाचा टायर बदलता येत नसल्याने ते काही काळ अडचणीत सापडले. यावेळी वाहतूक पोलीस त्या ठिकाणाहून पेट्रोलिंगसाठी जात होते. ही बाब लक्षात येताच पनवेल वाहतूक पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी तातडीने परिस्थितीची दखल घेत मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक केशव निकम यांनी पुढाकार घेत वाहनाचा टायर बदलण्यासाठी प्रत्यक्ष मदत केली. "अशा वाहतूक पोलिसांचा खरंच अभिमान वाटतो. पोलिसांबद्दल नागरिकांच्या मनात विश्वास निर्माण करणारी ही कृती आहे,"अशा भावना संबंधित कारचालकाने व्यक्त केल्या. त्याने "महाराष्ट्र पोलिसांचा अभिमान वाटतो" अशा आशयाचे स्टेटसही सोशल मीडियावर ठेवले आहे.



# न्हावा शेवा पोलीस विभागात मद्यपान व्यसनाबाबत जनजागृती उपक्रम

**उरण : बातमीदार**

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून नशामुक्त भारत अभियान अंतर्गत दर्शन नाईक, प्रतीक अमृते आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी न्हावा शेवा पोलीस विभागासाठी मद्यपानाच्या व्यसनाबाबत जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित केला.



या उपक्रमाद्वारे मद्यपान हे केवळ व्यसन नसून एक आजार आहे, हा महत्त्वाचा संदेश देण्यात आला. मद्यपानाचे व्यसन कोणत्याही व्यक्तीला तिचे वय, व्यवसाय, जात किंवा सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी न पाहता होऊ शकते. त्यामुळे व्यसनाधीन व्यक्तीकडे दोषी म्हणून न पाहता तिला योग्य उपचार, आधार आणि पुनर्वसनाची संधी देणे आवश्यक आहे, याबाबत जनजागृती करण्यात आली.

या सामाजिक उपक्रमासाठी न्हावा शेवा पोर्ट डिव्हिजन, नवी मुंबईचे एसीपी विजय चौधरी आणि न्हावा शेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सूरज पाटील यांनी मद्यपानाच्या समस्येची गंभीरता ओळखून या जनजागृती उपक्रमाला सहकार्य केल्याबद्दल दर्शन नाईक, प्रतीक अमृते आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानले.'नशामुक्त भारत' या संकल्पनेला बळ देण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

## संपादकीय

# मानसिक नक्षलवाद

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून केलेल्या ऐतिहासिक भाषणात देशाच्या अखंडतेला आव्हान देणाऱ्या मानसिक नक्षलवादाचा केलेला उल्लेख अत्यंत सूचक आणि डोळे उघडणारा आहे. बंदुकीच्या नळीतून येणाऱ्या नक्षलवादाचा बिमोड केल्यानंतर आता देशाच्या विकासात खोडा घालणाऱ्या बौद्धिक आणि मानसिक अराजकतेविरुद्ध लढण्याची वेळ आली आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून केलेल्या भाषणात देशाच्या अखंडतेला आणि प्रगतीला आव्हान देणाऱ्या मानसिक नक्षलवादाचा केलेला उल्लेख अत्यंत सूचक आणि गंभीर आहे. जंगलातील सशस्त्र नक्षलवाद संपुष्टात येत असताना शहरांमध्ये आणि बौद्धिक वर्तुळात पसरत चाललेल्या या छुप्या मानसिक दहशतवादाला ओळखून त्याचा समूळ उच्चाटन करणे हेच 'विकसित भारत २०४७'चे स्वप्न पूर्ण करण्यासाठीचे सर्वात मोठे आव्हान आहे. गेल्या काही वर्षांत भारताने अंतर्गत सुरक्षेच्या आघाड्यांवर मोठे यश मिळवले आहे. जंगलांमधील सशस्त्र नक्षलवादी चळवळींचा प्रभाव कमालीचा मर्यादित करण्यात सुरक्षा दलांना यश आले आहे, हा नक्षलवाद आता केवळ शस्त्रांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर त्याने एक नवे 'मानसिक' किंवा 'वैचारिक' रूप धारण केले आहे. हा दहशतवाद कोणत्याही बंदुकीशिवाय किंवा हिंसेशिवाय चालवला जातो. तो मानवी मेंदूचा ताबा घेतो आणि समाजात दुही पेरण्याचे काम करतो. अशी विशिष्ट मानसिकता जी देशातील तरुण पिढीच्या मनात येथील लोकशाही व्यवस्था, न्यायव्यवस्था आणि संविधानाबद्दल सातत्याने अविश्वास आणि द्वेष निर्माण करते. समाज घटकांमध्ये जाणीवपूर्वक भेद निर्माण करून आंदोलनांच्या नावाखाली हिंसेची आणि अराजकतेची पार्श्वभूमी तयार केली जाते. भारताच्या वाढत्या जागतिक प्रभावाला, आर्थिक प्रगतीला आणि देशांतर्गत पायाभूत सुविधांच्या विकासाला अंतर्गत पातळीवरून कमकुवत करण्याचा अजेंडा याद्वारे राबवला जातो. एवढेच नव्हे; तर प्रसारमाध्यमांचा वापर करून देशाच्या हिताच्या विरोधी असलेल्या विचारांना 'प्रगतीशील' म्हणून सादर केले जाते. थोडक्यात सांगायचे तर हा एक प्रकारचा 'व्हाइट कॉलर दहशतवाद' आहे, जो प्रत्यक्ष युद्ध न खेळता देशातील तरुणांची बौद्धिक क्षमता विघातक मार्गांकडे वळवण्याचा प्रयत्न करतो. या पार्श्वभूमीवर लाल किल्ल्यावरून बोलताना पंतप्रधान मोदींनी या वैचारिक धोक्याचा केवळ उल्लेखच केला नाही, तर त्यावर मात करण्यासाठी देशातील १४० कोटी जनतेला एक स्पष्ट संदेश दिला, तो म्हणजे दिमागी नक्षलवाद्यांना ओळखा आणि वेगळे करा, जेणेकरून त्यांच्या विषारी विचारांचा संसर्ग पुढच्या पिढीला होणार नाही. पंतप्रधानांनी आपल्या भाषणात एक महत्त्वाचा इशारा दिला की, आता युद्धाचे स्वरूप बदलत चालले आहे. केवळ सीमांवरूनच हल्ले होत नाहीत, तर देशातील बँका, डेटा सेंटर्स, रिफायनरी आणि महत्त्वाच्या पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्यासाठी या मानसिकतेचा वापर केला जाऊ शकतो. त्यामुळे देशाची सुरक्षा ही केवळ सैन्याची नाही, तर प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. देशातील तरुणांची ऊर्जा ही भारताची सर्वात मोठी ताकद आहे. त्यामुळे पंतप्रधानांनी संदेश दिला की, तरुणांना या विघातक विचारसरणीच्या प्रभावापासून वाचवून, त्यांना राष्ट्रउभारणीच्या आणि विकसित भारत बनवण्याच्या मुख्य प्रवाहाशी जोडणे अत्यंत आवश्यक आहे. तरुणांनी नकारात्मकतेचा व्यापार करणाऱ्यांच्या जाळ्यात न अडकता सकारात्मक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे. भारताला जर २०४७पर्यंत खऱ्या अर्थाने विकसित राष्ट्र बनवायचे असेल, तर सीमांवरील सुरक्षेसोबतच वैचारिक आणि मानसिक दहशतवादाचा बिमोड करणे अटळ आहे. या छुप्या अजेंड्याला ओळखून राष्ट्रप्रथम या भावनेने एकत्र येणे हीच आजच्या काळाची खरी गरज आहे.**

# तरुणांनो जलसंधारणात आता तुमची टर्न!

पाणी हा केवळ नैसर्गिक स्रोत नाही, तर आपल्या वर्तमानाचा आधार आणि भविष्यातील सुरक्षिततेची हमी आहे. आज आपण विकासाच्या वेगाने पुढे जात असताना पाण्याची उपलब्धता, भूजल पातळी आणि बदलते हवामान ही आव्हाने अधिक तीव्र होत आहेत. पाऊस पडतो, मात्र त्यातील प्रत्येक थेंब जमिनीत मुरतोच असे नाही. वाहून जाणारे पाणी, कमी होत जाणारी जलसाठ्यांची क्षमता आणि वाढता पाण्याचा वापर यामुळे जलसंधारणाचा प्रश्न आता केवळ शेतीपुरता किंवा ग्रामीण भागापुरता मर्यादित राहिलेला नाही. तो आपल्या प्रत्येकाच्या जीवनाशी जोडलेला आहे. म्हणूनच आजच्या तरुण पिढीने जलसंधारणाकडे केवळ एक शासकीय उपक्रम म्हणून नव्हे, तर आपल्या भविष्यासाठीची जबाबदारी म्हणून पाहण्याची गरज आहे.



"पाणी अडवा, पाणी जिरवा" हा विचार महाराष्ट्राच्या जलसंधारणाच्या वाटचालीतील महत्त्वाचा मूलमंत्र राहिला आहे. या विचाराला आजच्या काळातील आधुनिक तंत्रज्ञान, लोकसहभाग आणि तरुणांची ऊर्जा यांची जोड मिळाली तर जलसंधारणाची चळवळ अधिक व्यापक होऊ शकते. नाले, ओढे, विहिरी, तलाव आणि जलस्रोतांची स्वच्छता, पावसाचे पाणी साठविणे, भूजल पुनर्भरण, शेततळी आणि बंधाऱ्यांची निर्मिती, वृक्षारोपण अशा उपक्रमांमध्ये तरुणांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला तर त्याचा परिणाम केवळ एका गावापुरता मर्यादित राहणार नाही. एका तरुणाची कृती दुसऱ्याला प्रेरणा देईल आणि त्यातून गावागावांत जलसाक्षरतेची नवी चळवळ उभी राहू शकते.

आजची तरुणाई ही डिजिटल युगातील सर्वात प्रभावी शक्ती आहे. हातातील मोबाईल हा केवळ मनोरंजनाचे साधन न राहता जनजागृतीचे प्रभावी माध्यम बनू शकतो. एखाद्या जलसंधारणाच्या कामाचे छायाचित्र, छोटा व्हिडीओ किंवा माहितीपूर्ण Reel हजारो लोकांपर्यंत पोहचू शकते. "एक Reel मातीसाठी, एक Reel पाण्यासाठी आणि एक Reel सुरक्षित भविष्यासाठी" असा विचार घेऊन युवकांनी सोशल मीडियाचा सकारात्मक वापर केला तर जलसंधारणाला डिजिटल लोकचळवळीचे स्वरूप मिळू शकते. #SaveSoilSaveWater सारख्या संदेशातून पाण्याचे महत्त्व, पाणी बचतीच्या सवयी आणि स्थानिक जलस्रोतांच्या संवर्धनाची गरज समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचवता येईल.

जलसंधारणाची सुरुवात मोठ्या प्रकल्पांपासूनच झाली पाहिजे असे नाही. ती आपल्या घरापासून, महाविद्यालयापासून, कार्यस्थळापासून आणि गावापासून होऊ शकते. पाण्याचा अपव्यय टाळणे, गळणारे नळ दुरुस्त करणे, पावसाचे पाणी साठविण्याच्या पद्धती स्वीकारणे आणि आपल्या परिसरातील जलस्रोतांची स्थिती समजून घेणे ही देखील तितकीच महत्त्वाची पावले आहेत. प्रत्येक तरुणाने आपल्या परिसराचा "जलमित्र" किंवा "जलदूत" म्हणून विचार केला, तर पाण्याशी असलेले आपले नाते अधिक जबाबदार आणि संवेदनशील बनेल. कारण पाण्याची किंमत टंचाईच्या काळात समजण्यापेक्षा त्याची बचत समृद्धीच्या काळात करणे अधिक शहाणपणाचे आहे.

भविष्यातील महाराष्ट्र कसा असेल, यामध्ये आजच्या तरुणांचा वाटा निर्णायक असणार आहे. रोजगार, शिक्षण, तंत्रज्ञान आणि करिअर यांसोबतच पर्यावरण आणि नैसर्गिक संसाधनांच्या संरक्षणाची जाणीवही तरुणांच्या विचारविश्वाचा भाग झाली पाहिजे. जलसंधारण ही कोणत्याही एका विभागाची किंवा सरकारची जबाबदारी नाही; ती समाजाच्या सामूहिक सहभागातून यशस्वी होणारी प्रक्रिया आहे. शासनाच्या प्रयत्नांना नागरिकांचा सहभाग आणि तरुणांची कल्पकता यांची साथ मिळाली तर पाण्याच्या प्रश्नावर दीर्घकालीन आणि शाश्वत उपाय उभे राहू शकतात. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने १५ ऑगस्टपासून जलसंधारण सप्ताह तसेच अभियानास प्रारंभ करून, जलसंधारणाच्या विविध उपाययोजनांबाबत जनजागृती, लोकसहभाग आणि प्रत्यक्ष जलसंधारणाच्या कामांना शासन आणि लोकसहभागातून प्रोत्साहन देण्यात येत आहे.

म्हणूनच तरुणांनो, आता तुमची Turn आहे! फक्त पाण्याच्या प्रश्नावर चर्चा करण्याची नाही, तर कृती करण्याची. एखादा जलस्रोत स्वच्छ करण्यापासून सुरुवात करा, एखादे झाड लावा, पाण्याचा एक थेंब वाचवा, एखाद्याला पाणी बचतीचा संदेश द्या किंवा आपल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर जलसंधारणाची सकारात्मक गोष्ट शेअर करा. तुमची एक छोटी कृती अनेकांना प्रेरणा देऊ शकते.

"Save Soil, Save Water, Secure Tomorrow" हा केवळ Hashtag न राहता आपल्या कृतीचा मंत्र बनला पाहिजे. कारण माती वाचली तर पाणी टिकेल, पाणी टिकले तर शेती टिकेल आणि शेती टिकली तर आपले भविष्य सुरक्षित राहील. चला, माती वाचवूया, पाणी जपूया आणि आपल्या हातांनी जलसमृद्ध महाराष्ट्र घडवूया!


**–सचिन अडसूळ,** जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग

## 'ज्ञानप्रबोधिनी'चे संस्थापक डॉ. विनायक पेंडसे

डॉ. विनायक विश्वनाथ ऊर्फ अप्पा पेंडसे (जन्म : १७ ऑगस्ट १९१६; मृत्यू १९ ऑगस्ट १९८३) हे एक दूरदृष्टी असलेले देशप्रेमी शिक्षणतज्ज्ञ होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सदस्य असलेले अप्पा पेंडसे हे पीएचडी पदवी धारण करणारे, संगीत आणि वेदान्त या दोघांतही रस असणारे तत्त्वज्ञ, लेखक, मनात क्रांतिकारी विचार बाळगणारे आदर्शवादी कार्यकर्ते होते.

स्वामी श्रद्धानंदांची एका माथेफिरू माणसाने हत्या केल्यानंतर आपण श्रद्धानंदांची जागा घ्यायची असे अप्पा पेंडसे यांनी वयाच्या १०व्या वर्षी ठरवले.

ब्रिटिशांनी भारतात पाठविलेले सर्व ब्रिटिश सभासद असलेले सायमन कमिशन जेव्हा पुण्यात आले तेव्हा त्याचे काळ्या झेंड्यांनी स्वागत करणाऱ्यांमध्ये १२ वर्षांचे अप्पा पेंडसे होते. त्यावेळी जुन्या आणि नव्या हजारो कार्यकर्त्यांनी



भर उन्हात सायमन कमिशनचा धिक्कार करणारा लांबलचक मोर्चा काढला होता.

भारताचे भवितव्य ठरवणाऱ्या या कमिशनमध्ये एकही भारतीय का नसावा हा त्यांचा सवाल होता. वयाच्या १४व्या वर्षी त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी आणि सुराज्यासाठी स्वतःला वाहून घेण्याची प्रतिज्ञा केली.

अप्पा पेंडसे हे लाला लजपत राय यांच्या स्काउट दलात होते; भारताच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या मुक्तेश्वर दलात इ.स. १९३०मधे ते सामील झाले. १९३२मध्ये ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघात आले. सदूभाऊ गोखले यांनी सुरू केलेल्या राष्ट्र सेवा दलाच्या पुण्यातील पहिला सात सभासदांमधले ते एक होते. दलाच्या बँड पथकात ते बँड वाजवत. समाजगटांमध्ये व संस्थांच्या माध्यमातून काम करून भारताला स्वातंत्र्य मिळवून देणे या एकाच विचाराने ते भारले गेले होते. त्यांनी पुणे शहरात ज्ञानप्रबोधिनी नावाच्या शिक्षण संस्थेची १९६२मध्ये स्थापना केली. (साभार विकीपीडिया)



## बदलते तंत्रज्ञान

### गुगल पिक्सल ११ सीरिज भारतात लाँच

टेक क्षेत्रातील दिग्गज कंपनी गूगलने अखेर आपली बहुप्रतिक्षित 'Pixel ११' स्मार्टफोन सीरिज जागतिक स्तरासह भारतात लाँच केली आहे. या फ्लॅगशिप सीरिज अंतर्गत Pixel ११, Pixel ११ Pro आणि Pixel ११ Pro XL हे तीन स्मार्टफोन्स सादर करण्यात आले आहेत. शक्तिशाली Tensor G६ प्रोसेसर, Android १७ ऑपरेटिंग सिस्टीम आणि प्रो मॉडेल्समध्ये दिलेले अनोखे 'HiLight' हे LED अलर्ट फीचर या सीरिजचे मुख्य आकर्षण ठरत आहे.



**Pixel ११ Pro आणि Pro XL : अनोखे 'HiLight' फीचर काय आहे?**

प्रो मॉडेल्सच्या मागील कॅमेरा फ्लॅशभोवती LED लाईट्सची विशेष रचना करण्यात आली आहे. जेव्हा फोन उलटा ठेवलेला असेल, तेव्हा हे लाईट्स कस्टमायझेबल पॅटर्न प्रोजेक्ट करतात. 'Gemini AI' प्रश्न ऐकत असताना किंवा उत्तर देताना हे लाईट्स स्टेटस दाखवतात तसेच महत्त्वाच्या कॉल्ससाठी युजर्स कस्टम कलर कोड सेट करू शकतात.

डिस्प्ले : Pixel ११ Proमध्ये ६.३-इंचाचा १.५K LTPO AMOLED, तर Pro XLमध्ये ६.८-इंचाचा QHD+ AMOLED डिस्प्ले आहे. दोन्ही मॉडेल्स ३,६०० निट्स पीक ब्राइटनेस आणि १२०Hz रिफ्रेश रेटला सपोर्ट करतात.

कॅमेरा : मागील बाजूस ४८MP (मुख्य) + १३MP (अल्ट्रा-वाईड) + १०.८MP (५x टेलिफोटो) असा ट्रिपल कॅमेरा सेटअप आहे. फ्रंटला ४२MP चा सेल्फी कॅमेरा दिला आहे.

बॅटरी : Pixel ११ Proमध्ये ४,८४०mAh आणि Pro XLमध्ये ५,११५mAhची बॅटरी आहे. ३०W वायर व २५W Qi २.२ Pixelsnap वायरलेस चार्जिंगला सपोर्ट करतात.

**Google Pixel ११ : स्पेसिफिकेशन्स**

डिस्प्ले: ६.३-इंचाचा Full HD+ AMOLED डिस्प्ले (१२०Hz रिफ्रेश रेट, ३,००० निट्स ब्राइटनेस आणि Gorilla Glass Victus २ प्रोटेक्शन).

प्रोसेसर व सुरक्षा : Google Tensor G६ चिपसेट आणि डेटा सुरक्षेसाठी Titan M३ सिक्युरिटी चिप.


कॅमेरा : ४८MP मुख्य कॅमेरा + १३MP अल्ट्रा-वाईड + १०.८MP टेलिफोटो लेन्स; फ्रंटला १०.५MP सेल्फी कॅमेरा.

बॅटरी व इतर : ४,९८५mAh बॅटरी (३०W वायर्ड व २५W वायरलेस चार्जिंग), IP६८ वॉटर आणि डस्ट रेझिस्टन्स, अल्ट्रासॉनिक इन-डिस्प्ले फिंगरप्रिंट सेन्सर.

# मराठी इतिहासकार निनाद बेडेकर

निनाद बेडेकर हे एक मराठी इतिहासकार होते. छत्रपती शिवाजी महाराज तसेच मराठेशाहीच्या इतिहासावर त्यांचा विशेष अभ्यास होता. जगभरात फिरून पुरातन कागदपत्रांचा सखोल अभ्यास करून गडकिल्ले धुंडाळून ते शिवकालीन इतिहासात रममाण झाले होते.

निनाद बेडेकर यांचा जन्म १७ ऑगस्ट १९४९ रोजी पुण्यामध्ये झाला. मॉडर्न शाळेतील शिक्षणानंतर त्यांनी शासकीय तंत्रनिकेतन येथून अभियांत्रिकी अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यांच्या मातोश्री या सरदार रास्ते घराण्यातील होत्या. स्वातंत्र्य चळवळीमध्ये त्यांनी महिलांचे संघटन केले होते. हाच वारसा निनाद बेडेकर यांच्याकडे आला. शिवचरित्राची गोडी लागल्याने बेडेकर इतिहास संशोधनाकडे वळाले. इतिहासाच्या अभ्यासासाठी त्यांनी मोडी, फार्सी, उर्दू या लिपींवर प्रभुत्व मिळविले. या लिपीमध्ये असलेल्या हस्तलिखिते आणि कागदपत्रांचे वाचन करून त्यांनी साहित्यनिर्मिती केली. त्याचबरोबरीने बेडेकर यांनी पर्शियन, पोर्तुगीज, फ्रेंच आणि इंग्रजी या परकीय भाषा आत्मसात केल्या. शिवचरित्र आणि १८व्या शतकात देशभर विस्तारलेले मराठी साम्राज्य या विषयांचा त्यांचा गाढा अभ्यास होता. राज्यातील आणि देशातील किल्ल्यांवर



**निमित्त**

भ्रमंती करून शिवकालीन इतिहासामध्ये ते रममाण झाले होते. शिवरायांचा राज्यकारभार आणि मराठेशाही संदर्भात त्यांनी वेगळ्या दृष्टिकोनातून लेखन केले. शिवाजी महाराजांचे युद्धकौशल्य, नेतृत्वगुण, दुर्गबांधणी, आरमार उभारणी या पैलूंचा स्वतंत्रपणे अभ्यास करून त्यांनी लेखन केले होते. शिवरायांची व्यवस्थापकीय कौशल्ये हा विषय ते एमबीएच्या विद्यार्थ्यांना इंग्रजीमध्ये समजावून सांगत असत.

लालित्यपूर्ण शैलीमध्ये ऐतिहासिक लेखन करणाऱ्या बेडेकर यांची 'शिवभूषण', 'थोरलं राजं सांगून गेलं', 'गजकथा', 'हसरा इतिहास', 'दुर्गकथा', 'विजयदुर्गचे रहस्य', 'समरांगण' आणि 'झंझावात' ही निनाद बेडेकर यांची पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांनी ३५ पुस्तकांसह शेकडो लेख आणि शोधनिबंध लिहिले. गेल्याच महिन्यात त्यांचे 'अजरामर उद्गार' हे अखेरचे पुस्तक प्रकाशित झाले होते. तर, वसंत व्याख्यानमालेमध्ये २८ एप्रिल रोजी 'महाराष्ट्राबाहेरचा महाराष्ट्र' या विषयावर झालेले व्याख्यान हा बेडेकर यांचा अखेरचा सार्वजनिक कार्यक्रम ठरला. भारत इतिहास संशोधक मंडळ, श्री रायगड स्मारक मंडळ, श्री राजगड स्मारक मंडळ, गोनीदा दुर्गप्रेमी मंडळ या संस्थांशी संबंधित असलेले बेडेकर हे पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धांचे आयोजन करणाऱ्या 'महाराष्ट्रीय कलोपासक' संस्थेचे अध्यक्ष होते. निनाद बेडेकर यांना शिवभूषण, दुर्ग साहित्य पुरस्कार, जिजामाता विद्वत गौरव पुरस्कार, पुराण पुरुष पुरस्कार, शिवपुण्यतिथी रायगड पुरस्कार या पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते. शनिवारवाडा येथील ध्वनिप्रकाश योजनेमध्ये दाखविल्या जाणाऱ्या ऐतिहासिक कार्यक्रमासाठी बेडेकर यांनी संहितालेखन केले होते. १० मे २०१५ रोजी पुण्यात त्यांचे निधन झाले. बेडेकर यांना किडनीविकार जडला होता. ६५व्या वर्षी त्यांनी खासगी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### रेड पेअर फळ खाण्याचे अनेक फायदे

फळांनी आपल्या शरीराला पोषक तत्व मिळत असतात. त्यामुळे डॉक्टरांपासून ते घरातील वयस्कर मंडळी मुलांना फळे खाण्याचा सल्ला देत असतात. प्रत्येक मोसमातील फळांचा आस्वाद घ्यायलाच हवा. रेड पेअर हे फळ ज्याला हिंदीत लाल नाशपाती असे नाव आहे. हे फळ पावसाळ्यात मिळते हे फळ आरोग्यासाठी महत्वाचे आहे. रेड पेअर या फळाला गरीबांचे सफरचंद म्हणतात. हे फळ खूपच आरोग्यदायी फळ आहे. या फळाचा आहारात समावेश केल्याने खूपत फायदे मिळतात. त्यामुळे आपले आरोग्य सुधारते. अनेक लोकांना या फळाबाबत फारसी माहिती नाही. चला तर पाहूयात रेड पेअरच्या खाण्याने आरोग्याला काय फायदा होतो.



**रोग प्रतिकारकशक्ती वाढते**

रेड पेअरमध्ये सी विटामिन्स भरपूर प्रमाणात असते. त्यामुळे लाल पेअर फळ आपली इम्युनिटी वाढण्यासाठी उपयोगी पडते. या फळात कॉपरची तत्वेदेखील खूप असतात. ज्यामुळे इन्फेक्शनपासून लढण्याची ताकद मिळत असते.

**गर्भवती महिलांसाठी उपयोगी**

जर गर्भवती महिलांनी रेड पेअरचा वापर आहारात केला तर खूपच आरोग्याला फायदा मिळतो. यात फोलिक एसिड असल्याने कोणत्याही अनुवंशिक विकलांगतेला हे फळ रोखते. आणि आई आणि बाळाच्या आरोग्याचे रक्षण करते.

**पचनव्यवस्था सुधारते**

पचन व्यवस्था सुधारण्यासाठीदेखील हे रेड पेअर फायदेशीर ठरते. रेड पेअरमध्ये फायबर आणि पोटॅशियम भूरपूर प्रमाणात असते. त्यामुळे ब्लड प्रेशरदेखील सामान्य राहण्यासाठी मदत होते तसेच हृदयरोगातदेखील हे फळ सेवन करणे फायदेशीर सिद्ध होते.

**ब्लड शुगर कंट्रोल करते**

रेड पेअरमध्ये एंथोसायनिन भरपूर असते. त्यामुळे ब्लड प्रेशर सामान्य राहाण्यास मदत मिळते. त्यामुळे रेड पेअर याला आहारात सामील केल्यास टाईप - २ डायबिटीजची धोका करण्यास मदत मिळते.

**फ्री रेडिकिल्सपासून बचाव**

रेड पेअरमध्ये विटामिन्स ए,सी आणि के भरपूर असते. त्यामुळे फ्रि रेडिकिल्सपासून वाचता येते. या फळात एंटिऑक्सीडेंट तत्व खूप आढल्याने त्यामुळे पेशी डॅमेज होण्यापासून वाचतात.

# 'वंदे मातरम'च्या अवमानाविरोधात माणगावात भाजयुमोचा रास्ता रोको!

## कार्यकर्त्यांनी ठिय्या देत काँग्रेसच्या भूमिकेचा केला निषेध



**माणगाव : प्रतिनिधी**

दिल्ली येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त काँग्रेस पक्षाच्या कार्यक्रमात 'वंदे मातरम्'च्या पूर्ण गायनावर काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी आक्षेप घेतल्याचा आरोप भाजपकडून करण्यात आल्यानंतर या प्रकरणाचे पडसाद रायगड जिल्ह्यातील माणगावात उमटले. या आक्षेपाच्या निषेधार्थ भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा दक्षिण रायगडच्या वतीने शनिवारी (ता. १६) मुंबई–गोवा महामार्गावरील माणगाव बसस्थानका समोर रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. भाजप युवा मोर्चाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत व नेतृत्वाखाली सकाळी सुमारे ११.४५ वाजता हे आंदोलन करण्यात आले.

भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगड मधील आंदोलकांनी माणगाव बस स्थानका समोर महामार्गावर ठिय्या देत भारत माता की जय, वंदे मातरम् घोषणाबाजी करत सोनिया गांधीचा धिकार असो. अशा घोषणा देत हातात तिरंगा ध्वज तसेच 'वंदे मातरम् का अपमान नहीं सहेगा हिंदुस्तान' अशा आशयाचे निषेध बॅनर घेऊन कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला. आंदोलना मुळे मुंबई–गोवा महामार्गावरील वाहतूक कांही काळ विस्कळीत होऊन वाहतूक कोंडी निर्माण झाली.

यावेळी बोलताना निलेश थोरे म्हणाले, देशाचे राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्' गायले जात असताना त्यावर आक्षेप घेणे आणि 'हे का वाजवले जात आहे?' अशी विचारणा करण्यात आल्याचा आरोप करत काँग्रेस पक्षाच्या मानसिकतेवर टीका केली. 'वंदे मातरम्'चा अवमान देशातील नागरिक सहन करणार नाहीत, असेही त्यांनी सांगितले. सोनिया गांधी, राहुल गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी राष्ट्रीय गीताचा अनादर केल्याचा आरोप करत त्यांनी देशवासीयांची माफी मागावी, अशी मागणी भाजप युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी केली.

दरम्यान, आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक प्रभावित झाल्याने माणगाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी आंदोलकांना रस्त्यावरून बाजूला होण्याची विनंती केली. मात्र आंदोलक आणि पोलीस यांच्यात शाब्दिक चकमक झाल्याने आंदोलक अधिकच संतप्त झाले. त्यानंतरही आंदोलक आंदोलनावर ठाम राहिल्याने पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले.

या आंदोलनात युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, माणगाव तालुकाध्यक्ष परेश सांगळे, जिल्हा चिटणीस गोविंद कासार, महिला तालुकाध्यक्ष रचना थोरे, तालुका सरचिटणीस किसन महाडिक, तालुका उपाध्यक्ष सुधीर म्हामुणकर, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष योगेश खडतर, साई विभाग उपाध्यक्ष निलेश दळवी, माणगाव शहराध्यक्ष राकेश जाधव यांच्यासह कुमुद जाधव, अमोल पवार, बळीराम खडतर, राजू तेटगुरे, नयन पोटले, समीर पवार, पंकज लहाने, पूजा पवार, हरी पवार, राजेश पवार, महादेव कदम, अनिकेत कांबळे, मंगेश सुतार, भारती सुतार आणि विनीत विश्वकर्मा आदी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

# स्वातंत्र्यदिनी विद्यार्थ्यांचे ध्वजवंदन चक्क गुडघाभर पाण्यात

## धाकटे शहापूर जिल्हा परिषद शाळेतील धक्कादायक वास्तव

**अलिबाग : प्रतिनिधी**

देशभरात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा होत असताना अलिबाग तालुक्यातील धाकटे शहापूर येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना मात्र गुडघाभर पाण्यात उभे राहून ध्वजवंदन करण्याची वेळ आली. या प्रकाराचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत असून, जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.



धाकटे शहापूर येथील जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचल्याने स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांना पाण्यातच उभे राहावे लागले. तिरंग्याला सलाम करताना विद्यार्थ्यांच्या पायाखाली चिखल आणि पाणी असल्याचे व्हिडिओत दिसून येत आहे. त्यामुळे या शाळेतील पायाभूत सुविधांची अवस्था किती बिकट आहे, याची कल्पना येते.

स्थानिकांकडून मिळालेल्या माहितीनुसार, शाळेच्या परिसरात पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक निचरा होण्यासाठी असलेली जागा अडवण्यात आल्याने ही समस्या निर्माण होत आहे. परिणामी पावसाळ्यात पाणी शाळेच्या परिसरात साचते. गेल्या २५ वर्षांपासून ही समस्या कायम असल्याचे सांगण्यात येत आहे. दरवर्षी पावसाळा सुरू झाला की विद्यार्थ्यांना साचलेल्या पाण्यातून शाळेत ये–जा करावी लागते. मात्र, एवढ्या प्रदीर्घ काळापासून समस्या कायम असतानाही तिच्यावर कायमस्वरूपी तोडगा निघालेला नाही. सद्य परीस्थितीत जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी तिरंग्याला अभिमानाने सलाम करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पायाशी गुडघाभर पाणी साचल्याचे चित्र समोर आल्याने प्रशासनाच्या पायाभूत सुविधांच्या दाव्यांवरही प्रश्न उपस्थित झाले आहेत.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी
राम प्रहर

# मध्यरात्रीच्या ध्वजारोहणास कर्जतकरांचा उदंड प्रतिसाद

**कर्जत : प्रतिनिधी**

स्वातंत्र्य दिनी कर्जत तालुका मराठी पत्रकार संघ आणि कर्जत प्रेस क्लबच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मध्यरात्रीच्या ध्वजारोहण समारंभास कर्जतकरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून उदंड प्रतिसाद दिला. मध्यरात्रीच्या ध्वजारोहणाचे हे बाविसावे वर्ष आहे.

कर्जतच्या स्वर्गीय भाऊसाहेब राऊत चौकात १४ ऑगष्ट रोजी मध्यरात्री ध्वजारोहणाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम दिवंगत जेष्ठ पत्रकार वसंत ठाकूर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर रायगड प्रेस क्लबचे विभागीय सचिव ॲड. राहुल देशमुख यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रस्ताविकात मध्यरात्रीच्या ध्वजारोहणा विषयी माहिती सांगितली. चौकाच्या नामफलकाला नगराध्यक्ष पुष्पा दगडे यांनी पुष्पहार अर्पण केला. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते श्रीफळ वाढविण्यात आले. त्यानंतर बरोबर बारा वाजून पाच मिनिटांनी ग्राउंड रिपोर्ट करून रस्त्याची परिस्थिती दाखविणाऱ्या कु. नेहा आत्माराम घारे हिच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



यावेळी तिची मैत्रीण कु. जोत्स्ना रोहिदास मुकणे, रायगड प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष संजय मोहिते, कर्जत तालुका मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष विजय मांडे, कर्जत प्रेस क्लबचे अध्यक्ष गणेश पवार, कार्याध्यक्ष विलास श्रीखंडे, सचिव अजय गायकवाड, अनिल गवळे, ज्ञानेश्वर बागडे, विपुल माळी, रमाकांत जाधव आदी उपस्थित होते. त्यानंतर नगराध्यक्ष दगडे यांच्या हस्ते ग्राउंड रिपोर्ट दाखवणाऱ्या कु. नेहा घारे व कु. जोत्स्ना मुकणे यांचा शाल, गुलाबपुष्प आणि सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी माजी नगराध्यक्ष राजेश लाड, रजनी गायकवाड, माजी उपगराध्यक्ष उमेश गायकवाड, नगरसेवक अशोक राऊत, रामदास गायकवाड, महेश चंदन, मानसी कानिटकर, सुमिता गायकवाड, विजय हरिश्चंद्रे, विनायक उपाध्ये, ॲड. कैलास मोरे, ॲड. प्रदीप सुर्वे, अशोक शिंदे, पंकज ओसवाल, नलिनी साळोखे, रवींद्र लाड, नयनेश दळवी, विकास चित्ते, मुफद्दल डाभिया, ज्ञानेश्वर वाडीले, असीफ मिर्झा, आत्माराम घारे, राजेंद्र वैशंपायन, कल्पेश शहा, साईनाथ श्रीखंडे, गणेश कांबळे, मंदार दगडे, शैलेश सातपुते, रोहिदास मुकणे, अमीर माणियार, नवाज तांबोळी, साहिल ठाकूर, गौरव चित्ते, वेदांत किरडावकर, आदिंसह देशप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पेण येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी घेतली व्यसनमुक्ती व कॉपी न करण्याची शपथ

**पेण : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्यदिन पेण तालुक्यात मोठ्या उत्साहाने आनंदी वातावरणामध्ये साजरा करण्यात आला यावेळी शाळा महाविद्यालय नगरपालिका पंचायत समिती वाचनालय प्रांत कार्यालय या ठिकाणी ध्वजारोहण करून वंदना देण्यात आली.

भारत माता की जय ,जय जवान जय किसान, वंदे मातरम, स्वतंत्र भारताचा विजय असो अशा विविध घोषणांनी सारा परिसर दुमदुमून गेला. शालेय विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीची आणि भविष्यात येणाऱ्या परीक्षेत कॉपी न करण्याची शपथ घेऊन संकल्प केला.

उपविभागीय अधिकारी पेण कार्यालय येथे प्रांताधकारी प्रविण पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी आमदार रवीशेठ पाटील जिल्हा परिषद कृषी सभापती वैकुंठ पाटील, नगराध्यक्ष प्रीतम पाटील उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील नायब तहसीलदार प्रसाद कालेकर डीवायएसपी जालिंदर नालकुळ, पेण पोलीस निरीक्षक प्रदीप भोसले मुख्याधिकारी जीवन पाटील कृषी अधिकारी सागर वाडकर, पेण पंचायत समितीच्या सभापती स्मिता पाटील, उपसभापती संजय डंगर पंचायत समिती सदस्य नगरसेवक पेण शहरातील प्रतिष्ठित नागरिक यावेळी उपस्थित होते.

पेण एज्युकेशन सोसायटीच्या संकुलात आयोजित केलेल्या ध्वजारोहण प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मंगेश नेने कार्याध्यक्ष प्रशांत ओक, उपकार्याध्यक्ष संजय कडू, सेक्रेटरी सुधीर जोशी सर्व संचालक मंडळ कन्याशाळा, प्रायव्हेट हायस्कूल इंग्रजी माध्यमाची शाळा भाऊसाहेब नेने महाविद्यालय, प्राथमिक शाळा या सर्व शाळांचे मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी वंदे मातरम गीतांचे सामुदायिक गायन करून, राष्ट्रगीत ध्वजगीत, समूहगीत गायन केले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **मे . व्हीटु लॉजिस्टिक प्रा.लि. तर्फे अधिकृत संचालक सरबजीत सिद्धू** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे जुई (५५३३३०)**
(PU-ID : 15430468693), **तालुका–उरण, जिल्हा–रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १२८/१/क खाते क्र.७५७ | १ | ०.२९.१० पो.ख. ०.०४.३० **एकुण ०.३३.४०** | ३.५६ |

**या क्षेत्रापैकी विक्रेते यांच्या एकुण ०.३३.४० गुंठ्याचे खरेदीखत**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १७/०८/२०२६

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी–१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक–३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा–रायगड ४१०२०६. मो. क्र. ९९२०४७५८०१

# खडकाळ जमिनीत फुलवला भाजीपाल्याचा मळा

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहरातील मुंढेच्या वाडीतील प्रकाश मुंढे यांनी जिद्द व चिकाटीच्या बळावर खडकाळ जमिनीत सेंद्रीय भाजीपाल्याचा मळा फुलवला आहे.तळा शहरातील तळा–मांदाड रस्त्याच्या लगत अंदाजे दोन एकर क्षेत्रावर भेंडी,दुधी भोपळा,पडवळ,कार्ली, शिराळी, आळूवडीची पाने इत्यादी प्रकारची भाजीपाल्याची लागवड केली आहे.



भाजीपाला तयार करतांना प्रथम चांगले दर्जेदार बी बियाणे लागवडीसाठी घेतले जाते. ही भाजीची लागवड केली जाते त्या जागेवर शेणखत व गोवरी टाकून त्याठिकाणी भाजीपाला लागवड केली जात आहे. आता ही भाजीची रोपे चांगली वाढली असून भाजीचे उत्पन्न देण्यास सुरुवात झाली आहे.

सध्या दुधी भोपळ्याची ३० वेली आहेत,पडवळाची ३६ वेली एव्हढी आहेत.कार्लीची३० वेली आहेत.शिराळा २० वेली आहेत.घोसाळा २१ वेली आहेत.काकडीच्या ६० वेली आहेत.या सर्वा पासून अंदाजे दररोज ४० ते ५० कीलो माल निघतो.काकडीचे उत्पन्न चालू झाले असले तरी ही काकडीचे गणेशोत्सवात चांगल्या पध्दतीने उत्पन्न निघण्यास सुरूवात होईल तसेच वांगी ७० रोपे,मिरची २०० रोपे,भेंडी –३०० रोपे ,माठ इत्यादी भाजीपाला लागवडी पासून योग्य हंगामात भाजीपाला उपलब्ध होणार असून भाजीपाल्याला मागणीही चांगली असून स्थानिक बाजारपेठेत हा माल संपत असतो.

श्रावण मास चालू झाला आहे.या मासामधे अनेक नागरिक भाजीपाला खाणे पसंत करतात तर सण व्रत वैकल्याचा करण्याचा हा मास आहे, आध्यात्मिक दृष्टीने या मासाला महत्व असल्याने भाजीपाल्याला अधिक मागणी असल्याने याच कालावधीत भाजीपाल्याचे पिक सुरू झाल्याने भाव चांगला मिळून उत्पादन चांगले मिळेल असा अंदाज आहे.भाजीपाल्याला योग्य सेंद्रिय खतांची मात्रा त्यामधे गुळ–ताक–पाणी यांचे मिश्रण, शेणखत , गोवरी यांचा वापर केला जातो.तसेच वृक्षांच्या पाल्याचा व गोमुत्राचा वापर करून किटकनाशक म्हणून फवारणी केली जाते.

पाण्याचा शिंपणा वेळेवर व नियोजना प्रमाणे केले जात आहे.सध्या पाऊस असल्याने पावसाचे पाणी पुरेपूर होते.त्यांनी कृषी अधिकारी व स्वदेस फाउंडेशनचे मार्गदर्शन घेतले आहे.त्यांचे मार्गदर्शन शेतीसाठी उपयोगी पडत आहे.मागीलवर्षी एक टण काळ्या भोपळ्याचे व अगोदर एक ट्रक चिबूडाचे पिक घेतले होते.या शेतकऱ्याची चिकाटी व मेहनतीच्या बळावरती माळरानावर भाजीपाला फुलवला असून त्यांचा आदर्श तरुण वर्गानी घेण्यासारखा आहे.एक शाश्वत विकासाच्या दृष्टीने एक चांगला शेतीचा भाजीपाला व्यवसाय आदर्शवत आहे.ही भाजीपाला शेती करण्यात त्यांची पत्नी मैथीली मुंढे यांचाही हातभार लाभत आहे.त्यांना तळा प्रेस क्लबचा उत्कृष्ट शेतकरी पुरस्कारही प्राप्त झाला आहे.

शेतकरी प्रकाश मुंढे यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले की मी या माळरानावर भाजीपाल्याचे उत्पादन अभ्यास करून व कृषी विभाग,स्वदेस फाउंडेशनचे मार्गदर्शन घेऊन तसेच शासकीय योजना व स्वदेसच्या योजनांचाही लाभ मिळाला ,यामुळे माझा आत्मविश्वास वाढून भाजीपाला शेती करण्यास मी सुरुवात केली.आपल्या या काळ्या व खडकाळ जमिनीत सोन आहे हे मी भाजीपाला शेती केली त्यावेळी मला उमगले.नोकरी करण्यापेक्षा शेतीत सर्व काही आहे.फक्त जिद्द,चिकाटी,मेहनत या बळावरती सर्व काही आपल्याला साध्य करता येतो हे मला समजले.मात्र माकडे पिकांचे नुकसान करीत आहेत.

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **राजेंद्र दशरथ घरत व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पुनाडे (५५३३४५)**
(PU-ID : 212900005179), **तालुका–उरण, जिल्हा–रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ७९/६ खाते क्र.१२७६ | १ | ०.१२.१० पो.ख. ०.००.०० **एकुण ०.१२.१०** | २.१९ |

**एकुण ०.१२.१० गुंठ्याचे खरेदीखत**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १७/०८/२०२६

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी–१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक–३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा–रायगड ४१०२०६. मो. क्र. ९९२०४७५८०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **रजनी गंधा व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे जुई (५५३३३०)**
(PU-ID : 29568369122), **तालुका–उरण, जिल्हा–रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ९९/२८ खाते क्र.१६७५ | १ | ०.२१.७० पो.ख. ०.०३.३० **एकुण ०.२५.००** | १.७५ |

**या क्षेत्रापैकी विक्रेते यांच्या एकुण ०.१६.०० गुंठ्याचे खरेदीखत**

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : १७/०८/२०२६

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी–१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड क्रमांक–३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा–रायगड ४१०२०६. मो. क्र. ९९२०४७५८०१

# खारघरमध्ये भव्य १११ फूट लांब तिरंगा यात्रा

**नवी मुंबई : बातमीदार**

खारघर येथे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतर्फे १११ फूट लांब तिरंगा यात्रेचे भव्य आयोजन करण्यात आले. भारताच्या ८०व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित ही तिरंगा यात्रा रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथून सुरू होऊन उत्सव चौक येथे पोहोचली. राष्ट्रध्वजाचा सन्मान, देशभक्तीची भावना आणि राष्ट्रनिर्माणाचा संदेश देत या यात्रेत पनवेल व खारघर परिसरातील १७०० हून अधिक विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

तिरंगा यात्रेदरम्यान संपूर्ण परिसरात राष्ट्रभक्तीचा उत्साह आणि जोशपूर्ण वातावरण पाहायला मिळाले. विद्यार्थ्यांसह नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत भारताच्या एकात्मता, अखंडता आणि गौरवाचे दर्शन घडविले.

यात्रेचा समारोप उत्सव चौक, खारघर येथे करण्यात आला. यावेळी अभाविपच्या राष्ट्रीय मंत्री पायल किनाके यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले. त्या म्हणाल्या, "ही स्वप्न पाहणारी आणि ती पूर्ण करण्याची तयारी ठेवणारी युवा पिढी आहे. त्यामुळे आता 'भारत माझ्यासाठी काय करणार?' यापेक्षा 'मी भारतासाठी काय करणार?' हे अधिक महत्त्वाचे आहे." असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.



यावेळी पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, अभाविप जिल्हा संयोजक ऋतुजा भोर आणि पनवेल महानगर मंत्री नील कदम यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी विद्यार्थ्यांना संबोधित करताना प्रशांत ठाकूर म्हणाले, "अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ही विद्यार्थ्यांना देशभक्तीची प्रेरणा देणारी आणि जगातील सर्वात मोठी विद्यार्थी संघटना आहे." युवा पिढीमध्ये राष्ट्रभक्तीची भावना रुजविण्याच्या अभाविपच्या कार्याचे त्यांनी कौतुक केले.

कार्यक्रमाच्या समारोपानंतर तिरंगा यात्रेत सहभागी झालेल्या विविध शाळा व महाविद्यालयांचा मान्यवर अतिथींच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी आणि नागरिकांनी जोशपूर्ण घोषणा देत राष्ट्रभक्तीने भारलेल्या वातावरणात उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# विभाजन विभिषिका दिनानिमित्त पत्रकार उदय निरगुडकर यांचा तरुणांशी संवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष उत्तर रायगडच्या वतीने विभाजन विभिषिका दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विशेष कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार तथा माध्यम सल्लागार डॉक्टर उदय निरगुडकर यांनी उपस्थितांशी आणि प्रामुख्याने तरुणांशी सखोलसंवाद साधला. हा कार्यक्रम शुक्रवारी पनवेल येथील विरूपाक्ष मंगल कार्यालयात पार पडला.

'नेमकं काय घडलं!-१९४७'ची फाळणी आणि सध्याची वैचारिक फाळणी या मुख्य विषयावर आधारित या कार्यक्रमात देशाच्या इतिहासातील १९४७ च्याफाळणीच्या वेदनादायक आठवणींना उजाळा देण्यात आला. तसेच आजच्याकाळातील वैचारिक फाळणीवर डॉक्टर उदय निरगुडकर यांनी आपल्या अभ्यासपूर्ण व ओघवत्या शैलीत सविस्तर भाष्य केले. युवकांनी देशाचा इतिहास बारकाईनेसमजून घेतला पाहिजे आणि योग्य दृष्टिकोन अंगी बाळगून वैचारिक प्रगल्भता वाढवली पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात उपस्थितांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली.या वैचारिक मंथनाचा लाभ घेण्यासाठी तरुण वर्ग आणि भाजप कार्यकर्त्यांनी



सभागृहात मोठी गर्दी केली होती.

या सोहळ्यास आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, प्रभाग समिती सभापती रवींद्र भगत, नगरसेवक मनोज भुजबळ, सुमित झुंझारराव, प्रवीण पाटील, नगरसेविका मोनिका महानवर, प्रीती जॉर्ज, रुचिता लोंढे, कुसुम पाटील, वर्षा ठाकूर, धनराज विसपुते, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, शहर उपाध्यक्ष केदार भगत, अमित ओझे, महिला मोर्चाच्या संध्या शारबिद्रे, माजी नगरसेविका प्रभाकर बहिरा, अभिषेक पटवर्धन आणि चिन्मय समेळ उपस्थित होते.

# फुंडे विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय फुंडे शाखेत भारताचा ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यालयाचे प्राचार्य महाराष्ट्र भुषण आदर्श शिक्षक बी.बी. साळुंखे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

राष्ट्रीय गीत, राष्ट्रगीत, ध्वजगीत, राज्यगीताने परिसर दुमदुमून गेला.उत्तम संगीत साथ उपशिक्षक एस. डी. नाईक व पी. ए. पाटील यांनी दिली.प्रसंगी व्यसन मुक्ती व कॉपी मुक्त अभियानाची शपथ उपशिक्षक एम. आर. पाटील व कु राधिका खामकर यांच्या समवेत विद्यार्थ्यांनी घेतली.त्यानंतर आर. एस.पी च्या विद्यार्थ्यांनी अप्रतिम संचलन केले, प्रमुख मार्गदर्शन क्रीडा विभाग प्रमुख डी.डी.पाटील यांनी केले.





प्रास्ताविक प्राचार्य बी. बी.साळुंखे यांनी केले. कांचन घुगे या विद्यार्थीनीने स्वातंत्र्य दिनाची माहिती सांगितली. या वेळी प्रा.आर. ए.खेडकर यांनी स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.प्रसंगी एनएमएमएस व शिष्यवृत्ती उत्तीर्ण तसेच प्राप्त विद्यार्थ्यांचा विभाग प्रमुख एम. आर.पाटील यांनी सन्मानचिन्ह देऊन गुणगौरव केला. त्यानंतर तिरंगा या गाण्यावर रुद्रा धुमाळ व सहकारी यांनी सुंदर नृत्य केले.

याप्रसंगी संगीतमय कवायतीचा आनंद सर्व विद्यार्थ्यांनी घेतला. प्रमुख मार्गदर्शन प्रा. केशव पवार यांचे लाभले. सदर कार्यक्रमास स्कूल कमिटी सदस्य राजेंद्र ठाकुर, प्राचार्य, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग उपस्थित होते.

# सानपाडा येथे ज्येष्ठ नागरिक संघातर्फे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा येथे सिताराम मास्तर उद्यानातील विरंगुळा केंद्रात ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने १५ ऑगस्ट २०२६ रोजी ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला. विभागीय नगरसेवक भाऊ भापकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी नगरसेविका शिल्पा ठाकूर, संघाचे अध्यक्ष मारुती विश्वासराव, शिवसेनेचे ( उबाठा) उपशहर प्रमुख अजय पवार, संघाचे आजी आणि माजी पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नगरसेवक भाऊ भापकर यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, आपल्याला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेक स्वातंत्र्य वीरांनी योगदान दिले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नियमांचे पालन करणे हे आपलं कर्तव्य आहे आपले शहर



स्वच्छ ठेवण्यासाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करावे.

ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष मारुती विश्वासराव यांनी सांगितले की, भारत हा १४० कोटीचा सर्वात मोठा लोकशाही देश असून, आपल्या देशाला महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सुभाष चंद्र बोस, भगतसिंग, राजगुरू, हुतात्मा बाबू गेनू, लोकमान्य टिळक अशा अनेक स्वातंत्र्यवीरांनी स्वातंत्र्य मिळवून दिले. त्या सर्व स्वातंत्र्यवीरांना ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने सलाम. आपले सैनिक सीमेवर आणि पोलीस देशांतर्गत सुरक्षेचे काम चांगल्या प्रकारे करीत असून खऱ्या अर्थाने देशसेवा करतात. त्यामुळेच आपणास रात्रीची चांगली झोप लागते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक भाषण संघाचे सचिव जगदीश एकावडे यांनी केले. याप्रसंगी संघाच्या उपाध्यक्षा सीमा बोराडे व इतर महिलांनी देशहितपर सामूहिक गीत म्हटले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघाचे पदाधिकारी लक्ष्मण गोळे, महादेव पाटील, राजेंद्र कदम, मंगला मानधने, जगन्नाथ देसाई, राजाराम घोलप, अमोल शेजाळे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पीएमश्री शाहू शाळेकडून विद्यार्थ्यांना सहाय्य



**नवी मुंबई : बातमीदार**

रबाळे येथील पीएम श्री शाहू विद्यालयाकडून नाशिकमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीचा हात पुढे करण्यात आला. नवी मुंबईचे महापौर सुधाकर सोनवणे यांच्या मार्गदर्शनातून आणि विचारांतून प्रेरणा घेत आणि श्रीमती अनुसया संभाजी सोनवणे चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यामार्फत १०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य वितरित करण्यात आले. नवी मुंबईतील 'पीएम श्री राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, रबाळे'येथील शिक्षक चमूने नाशिकच्या ग्रामीण भागात जात शाळेला मदतीचा भक्कम हात दिला.

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून रबाळे शाळेतील शिक्षकांनी नाशिक जिल्ह्यातील जि. प. प्राथमिक शाळा, वार्शी (ता. देवळा) येथ सोहळ्यास 'विशेष अतिथी' म्हणून हजेरी लावली. या 'ग्रामीण-नागरी स्नेहसेतू' उपक्रमांतर्गत वार्शी शाळेतील १०० हून अधिक गरजू विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य, वह्या, सुंदर दप्तर, रेनकोट, चित्रकलेची वही, रंग आणि क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात आले.वार्शी शाळेसाठी आवश्यक असलेल्या साउंड स्पीकरची मागणी ग्रामस्थांनी करताच, रबाळे शाळेच्या चमूने कोणतीही वेळ न दवडता त्याची तात्काळ पूर्तता केली.

नवीन दप्तर, रंग आणि खेळणी मिळताच मुलांच्या चेहऱ्यावर खुललेल्या निखळ हास्याने उपस्थितांची मने जिंकली. हा अभूतपूर्व आनंद पाहून वार्शी शाळेच्या मुख्याध्यापिका अहिरराव, एसएमसी अध्यक्ष सर्जेराव सोनवणे, देवळा तालुका मार्केट कमिटीचे अध्यक्ष विजू नाना सोनवणे,ग्रामपंचायत अधिकारी सर्व शिक्षकवृंद आणि ग्रामस्थांचे मन भरून आले. नवी मुंबईतील रबाळे शाळेचे शाळा समन्वयक कमलेश इंगळे, सत्रप्रमुख सनी पाटील, क्रीडाशिक्षक मनोज चव्हाण, तसेच अमोल वाघमारे, विशाल राजगुरू आणि गौरव पगार यांच्याकडून सातत्याने सोनवणे मार्गदर्शनाखाली शैक्षणिक उपक्रम राबवले जात आहेत.





**पनवेल : साईराज गोल्डन व्हिव सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, कोळखे पेठ सोसायटीच्या वतीने १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. यावेळी निवृत्त आर्मी मेजर अनिल चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाला सोसायटीचे अध्यक्ष, सचिव, इतर समिती सदस्य व सोसायटीचे रहिवासी उपस्थित होते. स्वातंत्र्य दिनानिमित हिंदुस्तान क्रेडिट सह गृह संस्था मर्यादित उमेश घार्गे, सोपान शिंदे व सहकारी यांच्या वतीने सोसायटीमध्ये सीपीआर प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते तसेच लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.**

# उरण बाजारात पारंपरिक मातीचे नाग दाखल



**उरण : वार्ताहर**

नागपंचमी सोमवारी (दि.१७) असल्याने उरण बाजारात पारंपरिक मातीचे नाग दाखल झाले असून नागरिक खरेदी करण्यात मग्न झाले आहेत.

नाग साईजप्रमाणे २० रुपयेपासून १५० रुपये किमतीने आम्ही विकतो, असे नाग विक्रेत्या सुरेखा कुभार यांनी सांगितले. याचबरोबर नागपंचमीच्या पुजेसाठी नागवेल २० रुपये, जिवती फोटो १० रुपये, लाह्या २० रुपये पुडी अशा दराने विकले जात होते.





## नभ उतरुनि येतो श्रावण!

आषाढ घनांच्या पल्याडाहून...नभ उतरुनि येतो श्रावण !
आगमनाने त्याच्या, सृष्टीचा. हर्षित होतो कणकण-क्षणक्षण !
इंद्रधनुच्या कमानी खालून... श्रावणसरींसह येतो श्रावण!
सागर-डोंगर, रानवनांतून... शेतात अंगणी येतो श्रावण!
वृक्षवेली-पशुपक्षी अन... पानाफुलांचा 'रंगारी' श्रावण सृष्टीच्या
हिरव्या कुशीत शिरतो... तिचा लाडका 'अवखळ' श्रावण !
पिवळ्या बनी रिमझिम सरी नाचती छुनछुन छुनछुन
थेंबथेंबांचे घुंगरू जणु म्हणती-आला, आलाच श्रावण!
सरीवर सरी नभांतुन येता... 'इंद्रधनु' तो होतो श्रावण!
मुरलीधराचा पावा वाजवीत.. श्रीकृष्णहि जणु होतो श्रावण!
नागपंचमी-नारळीपुनव-गोविंदा.. अन पवित्र रक्षाबंधन
इथल्या साऱ्या सण उत्सवांना... 'आनंदघन' हा येतो श्रावण !
उपास-तापास व्रतवैकल्यांची, करी परिपूर्ती 'लोभस' श्रावण!
माहेरवासिनींसह, घालितो..झिम्मा फुगडी हा'नटखट ' श्रावण !
शेतकऱ्यांच्या 'बैलपोळ्या'चे पूजन करितो 'कृतज्ञ' श्रावण!
जाता-जाता 'पिठोरी' लाहि... विनम्र वंदन करितो श्रावण !
सुगंध पसरवीत, नभी-अंगणी... गाणी गातो 'हसरा' श्रावण!
सरिसंगे ऊन-पाऊस खेळे,असा 'नाचरा' प्रेमळ श्रावण!
आनंद हिरवाईत आणणारा... मनकवडा हा 'मनस्वी' श्रावण!
चराचरातील वस्तूंत भिनणारा...'लाडाकोडा'चा येतो श्रावण !



सुरेशचंद्र म्हात्रे
ज्येष्ठ साहित्यिक, जासई (उरण)

# नवी मुंबई पोलीस दलातील १५ अधिकारी-अंमलदारांना मानाचे पदक

**पनवेल : वार्ताहर**

स्वातंत्र्यदिनाच्या ८०व्या वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी व अंमलदारांच्या दीर्घकालीन, निष्कलंक आणि उल्लेखनीय सेवेची दखल घेत पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी मानाच्या सेवा पदकांची घोषणा केली. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील अधिकारी-अंमलदारांसाठी ही घोषणा विशेष अभिमानाची ठरली असून, तब्बल १५ अधिकारी व अंमलदारांना अति-उत्कृष्ट, उत्कृष्ट आणि सी-६० सेवा पदके जाहीर झाली आहेत.

स्वातंत्र्यदिनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या प्रांगणात आयोजित ध्वजारोहण समारंभात पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या हस्ते पदकप्राप्त १४ अधिकारी-अंमलदारांचा गौरव करण्यात आला. पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनाही अति-उत्कृष्ट सेवा पदक जाहीर झाले असून, त्यांचा विशेष सन्मान पोलीस महासंचालकांच्या हस्ते स्वतंत्र सोहळ्यात करण्यात येणार आहे.

यावेळी बोलताना पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी नवी मुंबई पोलिसांच्या शिस्तबद्ध कार्यपद्धतीचे आणि कर्तव्यनिष्ठेचे कौतुक केले. जनतेच्या सुरक्षेसाठी अधिकारी व अंमलदारांनी केलेल्या अथक परिश्रमामुळेच हा गौरव मिळाला असल्याचे त्यांनी सांगितले. पदकप्राप्त अधिकारी-अंमलदारांसह त्यांच्या कुटुंबीयांचे अभिनंदन करून त्यांनी पुढील सेवेसाठी शुभेच्छा दिल्या.





### अति-उत्कृष्ट सेवा पदक

मिलिंद भारंबे (पोलीस आयुक्त), दीपक साकोरे (सहपोलीस आयुक्त), प्रमोद शेवाळे (अपर पोलीस आयुक्त, गुन्हे), शैलेशकुमार लक्ष्मीनारायण आंचलवार (सहाय्यक पोलीस आयुक्त, एचटीयू), प्रमोद भास्करराव तोरडमल (पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा), अंबादास रघुनाथ कांबळे (पोलीस उपनिरीक्षक, मनपा अतिक्रमण), सुनील रघुनाथ (सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, आरबीआय सुरक्षा), रघुनाथ नलावडे, विनोद भुजंग नवले (पोलीस हवालदार, बीडीडीएस), विकास प्रभाकर साळवी (पोलीस हवालदार, पनवेल तालुका) आणि शिवलिंग पांडुरंग ठिगळे (पोलीस हवालदार, गुन्हे शाखा) यांचा समावेश आहे.

### उत्कृष्ट सेवा पदक

अभय आत्माराम सांगळे (पोलीस नाईक, कळंबोली पोलीस ठाणे), समीर सुरेश पाटील (सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, सुरक्षा शाखा) आणि अर्चना जितेंद्र म्हात्रे (महिला पोलीस हवालदार, विशेष शाखा) यांना उत्कृष्ट सेवा पदक जाहीर झाले आहे.

### सी-६० सेवा पदक

पृथ्वीराज अजितसिंग घोरपडे (वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाचक, पोलीस आयुक्त) आणि तुकाराम सुरेश नांगरे (पोलीस उपनिरीक्षक, जलद प्रतिसाद पथक) यांचा सी-६० सेवा पदकासाठी समावेश आहे.

दरम्यान, सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, पोलीस उपआयुक्त प्रशांत मोहिते तसेच एसआरपीएफचे कमांडंट संजय जाधव यांचाही मानाच्या सेवा पदकांच्या यादीत समावेश असून, त्यांचा सन्मान लवकरच करण्यात येणार आहे.नवी मुंबई पोलीस दलातील अधिकारी-अंमलदारांच्या प्रदीर्घ आणि उल्लेखनीय सेवेचा झालेला हा गौरव पोलीस दलाचे मनोबल वाढविणारा ठरला आहे.

# रायगडात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा; ठिकठिकाणी ध्वजारोहण

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथील कोएसोच्या श्रीमती गु. रा. अग्रवाल विद्यामंदिर व सरेमल प्रतापमल जैन कनिष्ठ महाविद्यालयात भारताचा ८०वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात व दिमाखात साजरा करण्यात आला.



कार्यक्रमाची सुरुवात शाळा समितीचे चेअरमन नरेंद्र जैन यांच्या हस्ते ध्वजारोहण करून करण्यात आली. यावेळी माध्यमिक शाळा समितीचे सदस्य व प्राथमिक शाळा समितीचे चेअरमन अनिल काळे, माध्यमिक शाळा समिती सदस्य ॲड. सोनल जैन, सुभाष जैन, जयराम पवार, को.ए.सो. प्रशासकीय अधिकारी डॉ. संदेश गुरव, आनंदीबाई प्रधान वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश भगत, नागोठणे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य डी.एम. पवार, प्राथमिक शाळेच्या प्रमुख मुख्याध्यापिका लोखंडे, वरिष्ठ लेखनिक संतोष गोळे, शिक्षक प्रतिनिधी अभेसिंग गावित, निवृत्त शिक्षक भास्कर सोलेगावकर, जी.पी. पाटील, तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी व पालक उपस्थित होते.

स्वातंत्र्यदिनानिमित्त वंदे मातरम्, ध्वजवंदन, राष्ट्रगीत, राज्यगीत, ध्वजगीत, समूहगीत व तीन कौमी नारे यांसह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थिनींचे आरएसपी संचलन, उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांची कवायत तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे शिष्यवृत्ती परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव. इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत मोक्ष भरत भांगरे याने रोहा तालुक्यात प्रथम क्रमांक तर रायगड जिल्ह्यात पाचवा क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. त्याबद्दल शाळा समितीचे चेअरमन नरेंद्र जैन यांच्या हस्ते त्याचा बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला तसेच इयत्ता पाचवीच्या राज्य शिष्यवृत्ती परीक्षेत शौर्य संदीप झरेकर तसेच इयत्ता आठवीच्या राज्य शिष्यवृत्ती परीक्षेत पंखुडी अरुण नाथगोसावी, निधी नमेश शिर्के व आराध्या अशोक शिर्के यांनी उज्ज्वल यश संपादन केल्याबद्दल त्यांचाही बक्षीस देऊन गौरव करण्यात आला.

मुख्याध्यापक पवार यांनी वेळोवेळी शिक्षकांना मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेसाठी प्रोत्साहन दिले, तर माध्यमिक विभागातील शिक्षकांनी नियमित तासिका घेतल्याचे यावेळी सांगण्यात आले.

विद्यार्थी-विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीते सुंदर पद्धतीने सादर केली, तर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध देशभक्तीपर नृत्यांनी कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. विविध उपक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवकवर्गाने विशेष मेहनत घेतली.

**रोहा : प्रतिनिधी**

देशाच्या स्वातंत्र्य दिनानिमित्त रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये शाळा, महाविद्यालय, शासकीय कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, सामाजिक संस्थाच्या प्रांगणात ध्वजारोहण उत्साहात पार पडला.

रोहा अष्टमी नगरपरिषदेचे ध्वजारोहण नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार अनिकेत तटकरे, उपनगराध्यक्ष अहमद दर्जी, मुख्याधिकारी अजयकुमार एडके, सभापती महेश कोलाटकर, राजेंद्र जैन, निता हजारे, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, राष्ट्रवादी तालुका कार्याध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, नगरसेवक अजित मोरे, माज सवाल, सुप्रिया जाधव, माजी नगरसेवक सुभाष राजे, समिर सकपाळ, शिवसेना शहर प्रमुख प्रकाश कोळी, आप्पा शेडगे आदिसह निवृत्त सैनिक, रोहा अष्टमी नागरिक, नगरपरिषद कर्मचारी, विद्यार्थी, पालक, शिक्षक उपस्थित होते. यावेळी निवृत्त सैनिक यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.



रोहा तहसीलदार कार्यालय येथे उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले, यावेळी आ.अनिकेत तटकरे, नगराध्यक्ष वनश्री शेडगे, तहसीलदार किशोर देशमुख, नायब तहसीलदार राजेश थोरे, पुंडलिक मोकल, उज्ज्वला अंधारे, भाजप तालुका अध्यक्ष अमित घाग, माजी नगराध्यक्ष लालताप्रसाद कुशवाह, मोतीशेठ जैन, वसंत शेलार, अनिता शेडगे आदीसह रोहा अष्टमी नागरिक, नगरपरिषद, तहसील, पोलीस ठाणे येथील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

रोहा पोलीस ठाणे येथे पोलीस निरीक्षक अभय खाडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले असून यावेळी साहाय्यक पोलीस निरीक्षक शिवराम खाडे, उपनिरीक्षक सलमान खतीब, याकुब तडवी यांच्यासह रोहा पोलिस ठाण्यातील ३५ पोलिस अंमलदार उपस्थित होते.

रोहा पंचायत समिती येथे सभापती विजया पाशिलकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी गटविकास अधिकारी अमृता उंदरेपाटील, उपसभापती संजय मांडलुस्कर, गटनेते किसनराव मोरे, पंचायत समिती सदस्य सुरेश मगर, जगन्नाथ धनावडे, अरुणा हंबीर, तालुका आरोग्य अधिकारी प्रियंका साळुंखे, गटशिक्षणाधिकारी मेघना धायगुडे आदी उपस्थित होते.



**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पंचायत समितीच्या वतीने भारतीय स्वातंत्र्याचा ८० वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला, सभापती कृष्णा पारंगे यांच्या हस्ते ध्वजारोहण व उप सभापती भाई शिंदे, गटविकास अधिकारी संदीप कराड यांच्या उपस्थितीत पार पडला.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले, स्वातंत्र्य सेनानी यांच्या लढ्याला यश येऊन भारताला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त करून स्वातंत्र्य दिले, हा दिवस प्रत्येक भारतीयासाठी अत्यंत अभिमानाचा व राष्ट्रीय सण आहे. ज्यांनी देशासाठी बलिदान दिले त्यांना आदरांजली वाहतो,असे सभापती कृष्णा पारंगे यांनी प्रतिपादन करून त्यांनी प्लास्टिक मुक्तीची शपथ दिली.

यावेळी पंचायत समिती सदस्य सौ प्रमिला पाटील, सौ.गौरी गडगे, सहायक गटविकास अधिकारी प्रदीप कांबळे, गटशिक्षण अधिकारी, माजी उप सभापती उमेश गावंड, सरकारी वकील राजेंद्र येरूनकर, सर्व विभागाचे अधिकारी,कर्मचारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्वांनी भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



**पेण : स्वातंत्र्य दिनानिमित्त नगराध्यक्ष प्रितम पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.**

**चौक : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याचा ८० वा वर्धापन दिवस खालापूर नवीन प्रशासकीय कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तहसीलदार अभय चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



यावेळी सभापती कृष्णा पारंगे, उपसभापती भाई शिंदे, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, महसूल नायब तहसीलदार विकास पवार, संजय गांधी योजना नायब तहसीलदार मिलिंद तिन्हेकर, पुरवठा अधिकारी मनोज पवार उपस्थित होते.

भारतीय स्वातंत्र्याचा ८० वा वर्धापन दिवस खालापूर येथील नवीन प्रशासकीय कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तहसीलदार अभय चव्हाण यांनी ध्वजाला सलामी दिली. नवीन प्रशासकीय इमारत विद्युत रोषणाई करण्यात आली होती. यावेळी तहसीलदार अभय चव्हाण यांनी तंबाखू विरोधी शपथ दिली.१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारतीय स्वातंत्र्य मिळाले, स्वातंत्र्य सेनानी यांच्या लढ्याला यश येऊन भारताला ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त केले. हा दिवस प्रत्येक भारतीया साठी अत्यंत अभिमानाचा व राष्ट्रीय सण आहे. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर, सर्व विभागाचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ, विद्यार्थी, हेल्प फाऊंडेशन, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कर्ज देण्याचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक; रोहा पोलिसांकडून दोघांना अटक

**धाटाव : प्रतिनिधी**

कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवत नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या दोघांना रोहा पोलिसांनी अटक केली आहे. ओमकार रवींद्र हटके (वय ४०, रा. बदलापूर, ठाणे) आणि गौरव संतोष मयेकर ऊर्फ भालचंद्र रघुनाथ पाळव (वय ३४, रा. उलवे, नवी मुंबई) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी लियाकत महमद खेत (वय ५०, रा. सुडकोळी, ता. रोहा) यांनी वर्तमानपत्रातील जाहिरात पाहून आरोपींशी संपर्क साधला. जाहिरातीमध्ये व्यावसायिक कर्ज तसेच महिलांसाठी बचत व लघुउद्योगासाठी कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्याचे आमिष दाखवण्यात आले होते. त्यानंतर आरोपींनी फिर्यादींकडून संपर्क साधून कर्ज मिळवून देण्याच्या नावाखाली १० लाख रुपयांचे कर्ज मिळवून देतो, असे सांगितले.

आरोपींनी कर्ज प्रक्रियेसाठी विविध कारणे सांगून फिर्यादींकडून रक्कम घेतल्याचा आरोप आहे. या प्रकरणी रोहा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी तपास सुरू केला.तपासादरम्यान आरोपींकडून ५ लाख रुपये किमतीची ह्युंदाई व्हेर्ना कार, ३० हजार रुपये रोख रक्कम, तसेच सॅमसंग झेड फोल्ड ४ आणि झेड फोल्ड ५ अशी दोन मोबाईल उपकरणे जप्त करण्यात आली आहेत. याशिवाय आरोपींनी बनावट नावाने तयार केलेली पासबुक, चेकबुक, लोकांना दिलेल्या पावत्या, आधारकार्ड, चेकबुक आदी कागदपत्रेही पोलिसांनी ताब्यात घेतली आहेत. रोहा पोलिसांनी केलेल्या तपासात आरोपींनी रोहा परिसरातील इतर नागरिकांनाही अशाच प्रकारे कर्ज देण्याचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक केल्याची शक्यता समोर आली आहे. याबाबत पुढील तपास सुरू आहे.

## शिपुरकर आणि वाघरे शाळेत बांबू प्रशिक्षण कार्यशाळा

**माणगाव : प्रतिनिधी**

भाऊ-बहिणीच्या प्रेमाचे प्रतीक असलेल्या राखीच्या सणाला आता पर्यावरणपूरक आणि स्वनिर्मित राखीची जोड मिळू लागली आहे. याच संकल्पनेतून माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या सुधाकर नारायण शिपुरकर शाळा आणि गणेश यशवंत वाघरे इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी बांबूपासून आकर्षक राख्या बनविण्याची विशेष प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना केवळ राखी बनविण्याचे कौशल्यच मिळाले नाही, तर निसर्गाशी जोडलेली सर्जनशीलता, स्वावलंबन आणि हस्तकलेचे महत्त्वही अनुभवता आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ संचलित बांबू कौशल्य विकास आणि संशोधन केंद्र, लोणेरे यांच्या वतीने या बांबू प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रकल्प व्यवस्थापक प्रा. श्रीनिवास वारखंड तसेच प्रशिक्षक श्री. प्रविण मास्टर आणि श्री. सुरेश धारवा सर यांनी विद्यार्थ्यांना बांबूपासून विविध वस्तू तयार करण्याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले.



कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांना बांबूची निवड, त्याची योग्य पद्धतीने हाताळणी, कापणी, आकार देणे तसेच त्यापासून सुंदर आणि आकर्षक राखी तयार करण्याची प्रक्रिया प्रत्यक्ष कृतीतून समजावून सांगण्यात आली. प्रशिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याकडे लक्ष देत त्यांना स्वतःच्या हाताने राखी तयार करण्यासाठी प्रोत्साहन दिले. सुरुवातीला बांबूपासून राखी कशी तयार होणार, याबाबत विद्यार्थ्यांच्या मनात कुतूहल होते; मात्र प्रत्यक्ष प्रशिक्षण सुरू झाल्यानंतर त्यांची उत्सुकता अधिक वाढली.

बांबूच्या छोट्या-छोट्या काड्यांना आकार देत, त्यांची कलात्मक मांडणी करत विद्यार्थ्यांनी सुंदर राख्या तयार केल्या. स्वतःच्या कल्पनेतून आणि मेहनतीतून तयार झालेली राखी हातात घेतल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद विशेष होता. तयार वस्तू बाजारातून खरेदी करण्यापेक्षा स्वतःच्या हाताने काहीतरी निर्माण करण्याचा अनुभव विद्यार्थ्यांसाठी भावनिक आणि प्रेरणादायी ठरला.


"शिकता शिकता स्वतःच्या हाताने निर्माण करणे आणि त्या निर्मितीतून आनंद मिळविणे" हा या उपक्रमाचा खरा गाभा होता. पर्यावरणपूरक जीवनशैली, पारंपरिक कौशल्य आणि आधुनिक शिक्षण यांचा सुंदर संगम घडविणारी ही कार्यशाळा विद्यार्थ्यांच्या कायम स्मरणात राहणारा अनुभव ठरली.

# माणगावकरांचे श्रद्धास्थान संगमेश्वर मंदिर

माणगावमध्ये काळ आणि गोद नदीच्या संगमावर श्री स्वयंभू संगमेश्वर देवस्थान आहे. या मंदिराच्या जीर्णोद्धारामुळे व मूर्त्यांच्या प्राणप्रतिष्ठापनेमुळे माणगावला धार्मिकदृष्ट्या महत्त्व प्राप्त होत आहे.

या मंदिराबाबत एक अख्यायिका सांगितली जाते. सन १६३० माणगावमध्ये जोगळेकर या शेतकऱ्याचे शेत नांगरताना नांगराच्या फाळाला टणक दगड लागला व त्यातून पाणी येऊ लागले. दुसऱ्या दिवशी त्याच ठिकाणी दुध, तर तिसऱ्या दिवशी रक्त येऊ लागले. त्यामुळे गावात आश्चर्याचे वातावरण निर्माण झाले. सर्व ग्रामस्थ एकत्र जमले आणि त्या शेतातील सर्व माती काढू लागले. हळूहळू तो दगड म्हणजे एक मोठी शिवपिंड असल्याचे जाणवले. स्वयंभू शंकराने माणगावात गोद आणि काळ नदीच्या संगमावर भाविकांना दर्शन दिले होते. तेव्हापासून या स्थानाला श्री संगमेश्वर असे संबोधले जाते.

श्री क्षेत्र संगमेश्वर मंदिरात महाशिवरात्रीच्या दिवशी अभिषेक, पूजा-अर्चा केली जाते. येथील जंगम घराण्याकडून संपूर्ण पूजा केली जाते. माणगावकरांचे श्रद्धास्थान असलेल्या या मंदिरात श्रावणी सोमवार, महाशिवरात्री, संकष्ट चतुर्थी, आषाढी एकादशी, दीपोत्सव कार्यक्रमाला भाविकांची दर्शनासाठी मोठी गर्दी असते. पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत भाविक येत असतात. शेजारील मारुती मंदिरातदेखील चैत्र वैद्य सप्तमीला मोठी यात्रा भरते.



संगमेश्वराने दर्शन दिल्यानंतर याच भागात त्याच्याही पूर्वीची काही कोरीव लेणी विरगळ येथे सापडली. ती अजूनही येथील ग्रामस्थांनी जपून ठेवली आहेत. त्यामधील एका मूर्तीमध्ये भाला घेऊन लढणारी एक आकृती दिसते. त्यावरून येथे कोणत्यातरी राजाने फार मोठा पराक्रम केल्याचे दिसते, परंतु त्यावर तेवढा अभ्यास केला गेला नाही किंवा ती माहिती तेवढी उजेडात आली नाही. या संगमेश्वर देवस्थानांविषयीची सनद अजूनही जंगम घराण्याकडे असल्याचे ढालघर येथी पुजारी जंगम यांनी सांगितली, परंतु ती सनद आज जीर्णावस्थेत असल्याचे समजते. त्यानंतर परकीय आक्रमणात महाराष्ट्रातील ज्या देव-देवतांची व देवळांची मोडतोड करण्यात आली त्यात या संगमेश्वर देवास्थानाचीसुद्धा तशीच अवस्था झाली.

सन १९४६ सालापर्यंत या देवस्थानाची मालकी ट्रस्टी कै.हरी वामन भाटे यांच्याकडे होती. समोरच दीपस्तंभ, त्याच्यासमोर नंदी आणि कौलारू छप्पर असलेले घरासारखे एक मंदिर म्हणून येथे भाविक आपले मनोरथ पूर्ण होण्याच्या दृष्टीने जा-ये करीत होते. कै. हरी वामन भाटे आणि कै. रामचंद्र राजाराम पाटणकर यांनी या मंदिराचे विश्वस्त म्हणून काम पाहिले. १९४६ साली त्याची रजिस्टारकडून नोंदणी करण्यात आली. आजही ही संस्था कार्यरत आहे.

कै.हरी भाटे यांच्यानंतर त्यांचे चिरंजीव शंकर भाटे यांच्याकडे गाववाल्यांनी आग्रह धरला, परंतु शिस्तप्रिय व प्रामाणिक सेवा करणारे शंकर भाटे मंदित ताब्यात देण्यास तयार होत नव्हते. मग ११ मार्च १९९७ रोजी स्व.आमदार अशोकदादा साबळे यांच्या पुढाकाराने भाटे यांची परवानगी घेऊन पहिली सभा झाली. भाटे यांची खात्री पटली आणि देवस्थान ग्रामस्थांच्या ताब्यात देऊन त्याचा यथोचित जिर्णोद्धार होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याचे ठरले. मग अशोकदादा साबळे यांच्या अध्यक्षतेखाली संगमेश्वर जीर्णोद्धार कमिटी स्थापली गेली. आज जवळजवळ ११ ते १२ लाख रुपये रोख देणगीद्वारे आणि इतर पाच लाखापर्यंत वस्तुरूपाने देणगी गोळा करून या मंदिराचा जीर्णोद्धार झाला आहे. त्यामुळे माणगावच्या सौंदर्यात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला.

माणगाव तालुक्यातील कान्होजी आंग्रेंकडे सेवक असलेल्या खंडोजी मापकरांचे समाधी असलेले खरवली हे ठिकाण तळागड येथील शिवकालीन किल्ला, कुडे येथील २६ बौद्ध लेण्या त्यावरील असंख्य शिलालेख, पाण्याच्या अकरा टाक्या, वडघर येथील साने गुरुजी स्मारक, निजामपूर येथे शहाबुद्धीन खानने संभाजी महाराजांचा पराभव केला तो ठिकाण, सन १८२५ ते १८७५ हा कालखंड गाजविणारे थोर समाजसुधारक विष्णुबुवा ब्रम्हचारी हे या शिरवलीचे महादेव मल्हार, नारायण मल्हार, वामन मल्हार, जोशी या विचारवंत साहित्यिकांची ही भूमी. आता श्री संगमेश्वराच्या पवित्र आणि भव्य मंदिरामुळे ती अजूनच आकर्षित करणारी ठरणार आहे.

या संगमेश्वर मंदिर परिसराचे सुशोभीकरण या वॉर्डाचे नगरसेवक दिनेश रातवडकर यांच्या विशेष प्रयत्नांनी करण्यात आले. या कामी त्यांना माणगाव नगरपंचायत, देवस्थान ट्रस्ट व संगमेशवर नगरवासीयांनी साथ दिली. आता या मंदिराच्या माध्यमातून सामाजिक शैक्षणिक आणि सांस्कृतिक बदल करून माणगावचा कायापालट करण्याचा निश्चय अशोकदादांनी घेतला होता. दादांचे धाकटे बंधू माणगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तथा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष संजयअण्णा साबळे यांनी याकामी लक्ष घालून संगमेश्वर मंदिर परिसर चोहोबाजून सुशोभित करून पर्यटनाच्या दृष्टीने विकसित केला आहे. याकामी त्यांना त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी विशेष साथ दिली. या मंदिर परिसरात या वर्षापासून प्रथमच देवस्थान ट्रस्टतर्फे नवरात्र उत्सव विविध कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव हा तालुका रायगड जिल्ह्यातील आकाराने सर्वात मोठा तालुका म्हणून प्रसिद्ध असला तरी प्राचीन परंपरा ब्रिटीशकालीन पूल इमारती आणि कोकणातील प्रसिध्द व्यापारी पेठ यामुळे माणगावला जास्त महत्त्व प्राप्त होत गेले. सहाव्या ते सातव्या शतकात या माणगावात फार मोठा पराक्रम होऊन गेल्याचे येथील काही प्राचीन मूर्तीच्या आधाराने स्पष्ट होत आहे. त्यातच संगमेश्वर मंदिर देवस्थान हे तमाम माणगावकरांचे श्रद्धास्थान असल्याने भाविक महाशिवरात्री, दीपोत्सव, श्रावणी सोमवारला मोठ्या संख्येने दर्शनासाठी मंदिरात येत असतात.

**-सलीम शेख, माणगाव**

# दुसऱ्या दिवसअखेर भारताच्या ४६० धावा

## श्रीलंकेविरुद्ध ध्रुव जुरेलचे शानदार अर्धशतक

**गॉल : वृत्तसंस्था**

देवदत्त पडिक्कलचे शानदार दीडशतक आणि ध्रुव जुरेलच्या महत्त्वपूर्ण अर्धशतकाच्या बळावर भारताने श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी ९ बाद ४६० धावांपर्यंत मजल मारली. पावसाचा व्यत्यय आलेल्या या दिवशी भारताने सात फलंदाज गमावले, तरीही तळाच्या फलंदाजांच्या मोलाच्या योगदानामुळे भारतीय संघ भक्कम स्थितीत पोहचला आहे. खेळ थांबला तेव्हा कुलदीप यादव १२, तर प्रसिद्ध कृष्णा एक रनवर नाबाद खेळत होते.

भारताने दुसऱ्या दिवसाची सुरुवात २ बाद २८८ धावांवरून केली होती. संघाने दिवसभरात १७२ धावा जोडताना सात विकेट्स गमावल्या. यामध्ये काही बळी श्रीलंकन फिरकीपटूंच्या फिरकीचे फलित ठरले, तर काही प्रसंगी भारतीय फलंदाजांचे चुकीचे फटके कारणीभूत ठरले.



पडिक्कलने १३१ धावांवरून आपल्या डावाला पुढे सुरुवात केली आणि उत्कृष्ट फलंदाजी करत १५० धावांचा टप्पा पार केला. त्याने संयम आणि आक्रमकता यांचा उत्तम मेळ साधला, मात्र चहापानापूर्वी तो १६७ धावांवर बाद झाला.

तत्पूर्वी भारताला दिवसाच्या सुरुवातीलाच ऋषभ पंतच्या रूपाने मोठा धक्का बसला. पंत ३९ धावांवर असताना केशरा नुवांथाच्या चेंडूवर मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात झेलबाद झाला. सोनल दिनूषाने धावत जात त्याचा सुरेख झेल घेतला. त्यानंतर आदल्या दिवशी ७७ धावांवर स्नायू ताणले गेल्याने 'रिटायर हर्ट' झालेला केएल राहुल पुन्हा फलंदाजीला आला, मात्र त्याला खात्यात अवघ्या चार धावांचीच भर घालता आली. नुवांथाच्या उसळत्या चेंडूवर राहुलने शॉर्ट लेगला उभ्या असलेल्या निशान मधुष्काकडे सोपा झेल दिला. या दोन विकेट्समुळे श्रीलंकन गोलंदाजांचा आत्मविश्वास दुणावला.

चहापानापर्यंत भारताची ५ बाद ३६४ अशी स्थिती होती. त्यानंतर रवींद्र जडेजा नुवांथाच्या चेंडूवर पायचीत होत ३७७ धावांवर सहाव्या फलंदाजाच्या रूपात बाद झाला.यानंतर ध्रुव जुरेलने डावाची सूत्रे हाती घेतली. मागील काही डावांत धावा हायला झगडणाऱ्या जुरेलने या सामन्यात शानदार पुनरागमन केले.तो २९ धावांवर असताना जयसूर्याच्या चेंडूवर स्लिपमध्ये श्रीलंकन कर्णधार धनंजय डी सिल्व्हाने त्याचा सोपा झेल सोडला.या जीवदानाचा जुरेलने पुरेपूर फायदा घेतला आणि सलग ८ डावांनंतर आपले पहिले अर्धशतक पूर्ण केले. त्याने नुवांथाला मिडविकेटच्या वरून षटकार आणि लाहिरू कुमाराला चौकार ठोकला.जुरेलने मानव सुतारसोबत सातव्या विकेटसाठी ५५ धावांची भागीदारी रचली. मात्र, अर्धशतकानंतर त्याला मोठी खेळी करता आली नाही. जयसूर्याच्या चेंडूवर डी सिल्व्हाने स्लिपमध्ये उत्कृष्ट झेल घेत आपली पूर्वीची चूक सुधारली.

जुरेल बाद झाल्यानंतरही भारताच्या तळाच्या फलंदाजांनी श्रीलंकन गोलंदाजांना चांगलेच दमवले. मानव सुतारने २४ धावांची उपयुक्त खेळी केली, तर मोहम्मद सिराजनेही काही आक्रमक फटके मारले. भारतीय संघ व्यवस्थापनासाठी सुतारची ही खेळी विशेष सकारात्मक ठरली आहे.

# बांगलादेशी टायगर्सकडून ऑस्ट्रेलियन कांगारूंची शिकार

## कसोटी मालिकेत १-०ने आघाडी

**डार्विन : वृत्तसंस्था**



बांगलादेशने ऑस्ट्रेलियाला त्यांच्याच भूमीत पराभूत करत इतिहास रचला आहे. २३ वर्षांच्या इतिहासात ऑस्ट्रेलियाविरुद्ध ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर कसोटी सामना जिंकण्याची बांगलादेशची ही पहिलीच वेळ ठरली. चौथ्या दिवशी नऊ विकेट्स राखून दिमाखदार विजय मिळवत बांगलादेशने दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

बांगलादेशच्या या ऐतिहासिक विजयाचा पाया पहिल्या डावातच रचला गेला. डार्विनमध्ये बांगलादेशने हसन महमूदच्या शानदार सहा विकेट्सच्या जोरावर ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव अवघ्या १९८ धावांत गुंडाळला होता. स्टीव्ह स्मिथने १०९ चेंडूंत ७१ धावांची झुंजार खेळी केली, मात्र त्याला इतर फलंदाजांची साथ मिळाली नाही. यानंतर फलंदाजीत बांगलादेशच्या तन्झीद हसन तमीमने केवळ दुसऱ्याच कसोटी सामन्यात शतक झळकावत १०१ धावांची खेळी केली. त्याच्या या शानदार खेळीमुळे बांगलादेशने पहिल्या डावात ४२६ धावा उभारल्या. मोमिनुल हक (४९), नजमुल हुसेन शांतो (८४) आणि मेहदी हसन मिराज (६५) यांनीही महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यामुळे बांगलादेशला पहिल्या डावात तब्बल २२८ धावांची आघाडी मिळाली.

दुसऱ्या डावात ऑस्ट्रेलियाने चांगली कामगिरी करण्याचा प्रयत्न केला, मात्र पुन्हा एकदा केवळ एकाच फलंदाजाने प्रतिकार केला. कॅमरून ग्रीनने २०१ चेंडूंत १०४ धावांची शानदार खेळी करत ऑस्ट्रेलियाला २८४ धावांपर्यंत पोहचवले. चौथ्या दिवशी विजयासाठी बांगलादेशसमोर अवघ्या ५७ धावांचे लक्ष्य होते.

**कमालीचा योगायोग!**

बांगलादेशच्या संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्ध १८ जुलै २००३ रोजी पहिला कसोटी सामना खेळला होता. कमालीचा योगायोग म्हणजे हा सामना डार्विनच्या मॅरारा क्रिकेट ग्राउंडवरच खेळवण्यात आला. त्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने पाहुण्या बांगलादेशचा डावाने आणि १३२ धावांनी पराभव केला होता. तब्बल २३ वर्षांनंतर याच मैदानावर बांगलादेशच्या संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिला कसोटी विजय नोंदवत इतिहास रचला आहे.

# जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेत राजेश गोहिल प्रथम

**पाली : प्रतिनिधी**

पाली येथे झालेल्या रायगड जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धेत कामोठे येथील राजेश गोहिल यांनी प्रथम क्रमांक पटकावत मानांकन पटकावले. पनवेलच्या अश्रफ खान यांनी द्वितीय, तर कामोठे येथील वैभव शिंदे यांनी तृतीय क्रमांक मिळविला.



पाली येथे भक्तनिवासाच्या दोन हॉलमध्ये रायगड जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धेचे आयोजन शिवसेना सुधागड तालुकाप्रमुख अनुपम कुलकर्णी यांच्या वाढदिवसानिमित्त रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनच्या मान्यतेने करण्यात आले होते. जिल्ह्यातील ६४ कॅरमपटूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला.

उद्घाटन समारंभास रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश तुळपुळे, शिवसेना तालुकाप्रमुख अनुपम कुलकर्णी, अभिजीत तुळपुळे आदी उपस्थित होते. स्पर्धेसाठी सुरको कॅरम कंपनीने १२ कॅरम बोर्ड उपलब्ध करून दिले होते.

पुरुष एकेरी गटातील विजेत्यासाठी १० हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक व भव्य चषक देण्यात आला तसेच स्पर्धेतील पहिल्या १६ क्रमांकाच्या खेळाडूंना पारितोषिके देण्यात आली.

स्पर्धेचे संपूर्ण नियोजन अभिजीत तुळपुळे व अभिजीत कॅरम क्लब, अलिबागच्या खेळाडूंनी केले. आंतरराष्ट्रीय पंच आशिष बागकर यांनी पंच म्हणून जबाबदारी सांभाळली, तर राज्यस्तरीय पंच देविदास सिनलकर यांनी सहाय्यक पंच म्हणून काम पाहिले.

रायगड जिल्ह्यातील कॅरम स्पर्धांसाठी सुरको कॅरम कंपनीकडून सातत्याने सहकार्य मिळत असून महाराष्ट्र कॅरम असोसिएशनचे सचिव व आंतरराष्ट्रीय खेळाडू अरुण केदार यांचेही नेहमीच मार्गदर्शन लाभत असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## गंभीर जखमी झालेल्या बॉक्सरचे अखेर निधन

**न्यूयॉर्क :** २०१५मधील एका बॉक्सिंग सामन्यादरम्यान डोक्याला गंभीर दुखापत झालेला बॉक्सिंगपटू प्रिचार्ड कोलन याचे वयाच्या ३३व्या वर्षी निधन झाले. त्याचे वडील रिचर्ड कोलन यांनी सोशल मीडियाद्वारे याबाबतची माहिती दिली.

टेरेल विल्यम्सविरुद्ध २०१५मध्ये झालेल्या सामन्यादरम्यान कोलन याने त्याच्या डोक्याच्या मागील भागावर वारंवार बेकायदेशीर ठोसे मारले जात असल्याची तक्रार पंचांकडे केली होती. हा सामना संपल्यानंतर कोलन ड्रेसिंग रूममध्ये कोसळला होता. मेंदूतील रक्तस्राव व सूज कमी करण्यासाठी त्याच्यावर तातडीने शस्त्रक्रिया करण्यात आली, त्यानंतर तो तब्बल २२१ दिवस कोमामध्ये होता. या दुखापतीमुळे कोलनला आयुष्यभर व्हेजिटेटिव्ह अवस्थेतच (बोलणे किंवा चालणे अशक्य असलेली गंभीर वैद्यकीय स्थिती) राहावे लागले आणि त्याला २४ तास वैद्यकीय सेवेची गरज होती. विल्यम्सविरुद्धच्या या सामन्यापूर्वी कोलन याने १६पैकी सर्व सामने जिंकले होते, त्यातील १३ विजय नॉकआऊटद्वारे मिळवले होते.

## विजयासह बांगलादेशने भारत, पाकिस्तानला टाकले मागे

**सिडनी :** ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर पहिला कसोटी विजय मिळवत बांगलादेशच्या संघाने मोठा पराक्रम केला असून भारत-पाकिस्तानचा विक्रम मोडीत काढला आहे. विशेष म्हणजे, ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर कसोटी विजय मिळवणारा बांगलादेश हा तिसरा आशियाई संघ ठरला असून या कामगिरीसह त्यांनी भारत आणि पाकिस्तानलाही मागे टाकले आहे.

डार्विनच्या मॅरारा क्रिकेट ग्राउंडवर ऑस्ट्रेलियाने बांगलादेशसमोर विजयासाठी अवघ्या ५७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. बांगलादेशने हे लक्ष्य अवघ्या १४.२ षटकांत एक विकेट गमावून पार केले. बांगलादेश ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर सर्वात कमी कसोटी सामन्यांमध्ये विजय मिळवणारा आशियाई संघ ठरला आहे. बांगलादेशने केवळ तीन कसोटी सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियात विजय मिळवला. भारताला ऑस्ट्रेलियात पहिला कसोटी विजय मिळवण्यासाठी १२ सामने लागले होते, तर पाकिस्तानने सात कसोटी सामन्यांनंतर ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर पहिला विजय मिळवल्याचा रेकॉर्ड आहे. श्रीलंकेच्या संघाने ऑस्ट्रेलियात आतापर्यंत १५ कसोटी सामने खेळले आहेत, मात्र त्यांना एकही विजय मिळवता आलेला नाही. ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर विकेट्सच्या फरकाने सर्वात मोठा कसोटी विजय मिळवणारा आशियाई संघ म्हणूनही बांगलादेशने विक्रम प्रस्थापित केला.

# विद्यार्थिनींना मोफत तायक्वांदो प्रशिक्षणाचा स्तुत्य उपक्रम

**पनवेल : वार्ताहर**

एच.डी. पाटील इंग्लिश मीडियम स्कूल नढाळ, जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल आणि रायगड तायक्वांदो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जवळपास ५०० विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन मुख्याध्यापिका निशा पोलेकर यांच्या हस्ते झाले.



शालेय विद्यार्थिनींना शारीरिक आणि मानसिक चालना देण्यासाठी तसेच कॉलेज आणि कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्याचा उद्देशाने त्यांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थिनींची छेड काढण्याचे प्रकार घडतात, अनेकदा त्यांच्यावर वाईट प्रसंगही ओढवतात. या पार्श्वभूमीवर महिला सुरक्षित राहिल्या पाहिजेत; विशेषतः शाळेतील विद्यार्थिनींचे स्वयंरक्षणासाठी आत्मबल वाढले पाहिजे या उद्देशाने जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था अंतर्गत असे उपक्रम राबविण्यात येतात.

आंतरराष्ट्रीय पंच, सातवी डिग्रीप्राप्त मुख्य प्रशिक्षक सुभाष पाटील व त्यांचे सहकारी अनिल म्हात्रे, रूपेश माळी, अक्षता भगत, प्रसाद मुंडे, सानिका म्हात्रे, तनिश माळी इत्यादींचे प्रशिक्षणासाठी मार्गदर्शन लाभले. विशेष म्हणजे या सेमिनारसाठी शाळेतील सर्व शिक्षिका उपस्थित होत्या आणि त्यांनीही प्रशिक्षण घेतले.



सौजन्य : विजय घरत (पनवेल पश्चिम मंडल उपाध्यक्ष, माजी उपसरपंच गव्हाण, ग्रामपंचायत)

## षटकारांमध्ये ऋषभ पंतने गेल, कॅलिस, साऊदीला टाकले मागे

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

श्रीलंकेविरुद्ध गॉल येथे सुरू असलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात भारताचा स्टार यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंतने नवा इतिहास रचला आहे. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात जलद षटकारांचा टप्पा गाठताना पंतने दिग्गज ख्रिस गेल, जॅक कॅलिस आणि टिम साऊदी यांचे विक्रम मोडीत काढले आहेत.



पहिल्या डावात ठोकलेल्या एका षटकारासह पंतच्या खात्यात आता ९८ कसोटी षटकारांची नोंद झाली आहे. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात कमी डावांत इतके षटकार ठोकण्याचा अनोखा विक्रम आता पंतच्या नावावर झाला आहे. या विक्रमात त्याने दिग्गज फलंदाजांना मोठ्या फरकाने मागे टाकले.

याआधी टिम साऊदीने १५६ डावांत, ख्रिस गेलने १८२ डावांत, तर जॅक कॅलिसने २८० डावांत ९७ षटकार ठोकले आहेत. पंतने कॅलिसला मागे टाकून सर्वाधिक षटकारांच्या यादीत चौथा क्रमांक गाठला आहे.

दरम्यान, पंतने या सामन्यात आणखी दोन षटकार खेचल्यास कसोटीत १०० षटकार मारणारा तो पहिला भारतीय व जगातील केवळ चौथा फलंदाज ठरेल. यापूर्वी बेन स्टोक्स (१२२ सामन्यांत १३८ षटकार), ब्रेंडन मॅक्युलम (१०१ सामन्यांत १०७ षटकार) आणि ॲडम गिलख्रिस्ट (९६ सामन्यांत १०० षटकार) केवळ तीनच खेळाडूंना हा टप्पा गाठता आला आहे.

# फुटबॉल विश्वविजेतेपदानंतर स्पेनचा क्रिकेटमध्ये मोठा पराक्रम

## सर्वाधिक सामने जिंकण्याचा ऑस्ट्रेलियाचा विक्रम मोडला

**पॅरिस : वृत्तसंस्था**

गेल्या महिन्यात झालेल्या फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत बलाढ्य अर्जेंटिनाचा पराभव करत स्पेनने विश्वविजेतेपद पटकावले होते. त्यानंतर आता क्रिकेटच्या मैदानामध्येही स्पेनच्या क्रिकेट संघाने मोठा पराक्रम करून दाखवला आहे. स्पेनच्या पुरुष क्रिकेट संघाने सलग २१वा आंतरराष्ट्रीय सामना जिंकत बलाढ्य ऑस्ट्रेलियाचा २३ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडीत काढला आहे.



स्पेनने हा विक्रम २०२८च्या टी-२० विश्वचषकासाठीच्या युरोप सब-रीजनल क्वालिफायर सीमध्ये खेळताना केला आहे. फिनलंडविरुद्ध झालेल्या लढतीत स्पेनला विजयासाठी १३२ धावांचे आव्हान मिळाले होते. हे आव्हान स्पेनने आठ गडी राखून पार केले आणि सहज विजय मिळवला. या विजयासह स्पेनचे विजय अभियान सलग २१व्या सामन्यापर्यंत पोहचले आहे. हा विक्रम आधी ऑस्ट्रेलियाच्या नावावर होता.

ऑस्ट्रेलियाने २००३ साली सलग १७ एकदिवसीय सामने जिंकले होते. या दरम्यान संपूर्ण स्पर्धेत अपराजित राहत ऑस्ट्रेलियाने विश्वचषकही जिंकला होता. त्यानंतर रिकी पाँटिंगच्या नेतृत्वाखालील या संघाने वेस्ट इंडिजमध्ये तीन कसोटी सामनेही जिंकले होते. अशा प्रकारे ऑस्ट्रेलियाची ही विजयी घोडदौड २०व्या सामन्यापर्यंत अखंड राहिली होती. दरम्यान, आता स्पेनच्या संघाने सलग २१ सामने जिंकत हा विक्रम मोडित काढला आहे.

स्पेनचा क्रिकेट संघ सध्या टी-२० क्रिकेटच्या आंतरराष्ट्रीय क्रमवारीत २८व्या स्थानी आहे. तसेच गेल्या तीन वर्षांपासून त्यांनी आपली कामगिरी उत्तरोत्तर उंचावली आहे. यादरम्यान स्पेनने युरोपमधील अनेक असोसिएट्स संघांना पराभूत केले आहे.



सौजन्य : हर्षदा उपाध्याय (माजी नगरसेविका, पमपा)

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, मुख्य संपादक : देवदास मटाले. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com